शनिवार । २९ जुलै १९७८
७५ पैसे

माणूस

# जनमत कौल : एक नवा उपक्रम

महाराष्ट्रात नुकतेच झालेले सत्तान्तर ही राजकीय क्षितिजावरील एक महत्त्वपूर्ण घटना आहे. या सत्तान्तरामुळे टिळक–गांधी–नेहरू यांची काँग्रेस संपली या टोकापासून, सर्व देशभर काँग्रेस एक होऊन मागील दाराने पुन्हा सत्तेवर येण्याची प्रक्रिया सुरू झाली या टोकापर्यंत, अनेक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. राजकीयदृष्ट्या जागरूक असलेला सर्वसामान्य नागरिकही या घटनेमुळे अस्वस्थ झालेला आहे, गोंधळलेला आहे. जनता पक्षाची ध्येयधोरणे, पुढील वाटचाल व एकूण भवितव्य या संदर्भातही या सत्तान्तराला विशेष अर्थ आज आलेला आहे.

या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांची या घटनेसंबंधीची प्रतिक्रिया जाणून घ्यावी म्हणून 'माणूस'द्वारा एक जनमतकौल घेण्याचे ठरले आहे. यासाठी एक अगदी छोटी प्रश्नपत्रिका तयार केली असून ती मुखपृष्ठ २ वर दिली आहे. हा कौल लवकर प्रसिद्ध होणे महत्त्वाचे असल्याने प्रश्नपत्रिका सर्वांनी शक्यतो लवकर, उशिरात उशीरा ५ ऑगस्टच्या आत भरून पाठवावी, ही विनंती.

ही प्रश्नावली तयार करण्यात पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्रविभागाचे प्रमुख प्रा. शिरसीकर आणि त्यांचे सहकारी यांचे सहकार्य लाभलेले आहे.

प्रश्नावलीतील माहिती गोपनीय राखली जाईल. ज्यांना प्रश्नावलीव्यतिरिक्त काही मतप्रदर्शन करावयाचे असेल त्यांनी ते प्रश्नपत्रिकेसोबत स्वतंत्र कागदावर लिहून पाठवावे. हे मतप्रदर्शन मात्र 'प्रसिद्धीसाठी' आहे असे गृहीत धरले जाईल व प्रसिद्धियोग्य वाटणारे मतप्रदर्शन वा प्रतिक्रिया 'माणूस'मधून किंवा अन्यत्र प्रसिद्ध केल्या जातील.

मतप्रदर्शन–प्रतिक्रिया शक्यतो थोडक्या शब्दात व्यक्त व्हाव्यात.

अशा कारणाकरिता घेतला जात असलेला 'जनमत-कौल' हा एक नवीन उपक्रम आहे. अधिकात अधिक संख्येने नागरिक यात सहभागी होतील व तो यशस्वी करतील अशी आशा आहे.

**–संपादक साप्ताहिक 'माणूस'**

# जनमत कौल : पाच प्रश्न

१. महाराष्ट्रात हे पहिले संमिश्र
पवार मंत्रिमंडळ येणे ही घटना मला............................योग्य वाटते / अयोग्य वाटते.

२. नव्या मंत्रिमंडळाचा बनाव लोकशाहीला.............................उपकारक आहे / मारक आहे.

३. या ( मंत्रिमंडळाच्या ) घटनेमुळे इंदिरा काँग्रेस
अधिक बळकट होईल असे आपल्याला वाटते काय ?..............होय / नाही.

४. या ( मंत्रिमंडळाच्या ) घटनेमुळे जनता पक्षाची प्रतिमा..........डागळली आहे / उजळली आहे.

५. नव्या मंत्रिमंडळाने पुढील सहा कार्यक्रमांपैकी
कोणत्या तीन कार्यक्रमांना प्राधान्य द्यावे
असे आपल्याला वाटते ?

१ : सक्तीचे कुटुंबनियोजन
२ : किमान वेतन–रुपये पाच
३ : सुशिक्षितांसाठी रोजगार हमी
४ : शेतीउत्पन्नावर कर
५ : प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय
६ : प्रत्येक गावात ‘ एक गाव एक पाणवठा ’

७ : संपूर्ण नाव व पत्ता ______________________

______________________

______________________

८ : व्यवसाय ______________________ ९ : वय ______________________

* उत्तरे देताना नको असलेले शब्द फक्त खोडायचे आहेत. न खोडलेला भाग उत्तर म्हणून समजण्यात येईल.

* पाचव्या प्रश्नात फक्त तीन कार्यक्रम सुचवायचे आहेत. जे कार्यक्रम प्राधान्यविचारासाठी नको असतील तेवढे खोडले जावेत.

* शक्यतो लवकर, उशिरात उशीरा ५ ऑगस्ट (१९७८)पूर्वी वरील प्रश्नपत्रिका भरून ‘ माणूस ’कडे पाठवायच्या आहेत.

* प्रश्नपत्रिका भरून, बद पाकिटातून ‘ माणूस ’कडे पाठवावी. पाकिटावर ‘ जनमतकौल ’ असे वर एका कोपऱ्यात लिहावे.

* ‘ माणूस ’ अंकाव्यतिरिक्त सुट्याही या जनमतकौलपत्रिका उपलब्ध आहेत.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक नववा

२९ जुलै १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४४३४५९

¤


## सप्रेम नमस्कार

¤ पुण्यातील काही स्त्री-संघटना आणि इतर पुरोगामी संघटना यांनी मिळून 'समाजात होणाऱ्या स्त्रीच्या अप्रतिष्ठेविरुद्ध' ९ जुलै रोजी एक मोर्चा काढला होता. निषेधाचे तात्कालिक निमित्त 'सत्यम्, शिवम्, सुंदरम्' हा चित्रपट होता. कारण या चित्रपटात स्त्रीच्या सर्व प्रकारच्या अप्रतिष्ठेची कमाल आहे, तसेच स्त्री म्हणून आणि ग्रामीण म्हणून अशी दुहेरी तुच्छता त्यात प्रदर्शित केली गेली आहे.

या मोर्चासंबंधीची एक प्रतिक्रिया 'माणूस'मध्ये वाचली. (१५ जुलै, चंद्रकांत दीक्षित) हे पत्र म्हणजे, समाजातील ज्या प्रवृत्तींविरुद्ध हा मोर्चा काढला गेला, त्यापैकी अनेक प्रवृत्तींचे मिळून एक नमुनेदार उदाहरण आहे. हा वृत्तांत पूर्णपणे अवास्तव तर आहेच; पण पत्रलेखकाचे सर्वांगीण अज्ञानही त्यात प्रतीत झाले आहे.

स्त्रियांचा कोणताही कार्यक्रम असला तरी, काही मंडळी केवळ त्याची कुचेष्टा करण्यासाठी, कोणी कसा पोषाख केला आहे हे बघण्यासाठीच येतात. या मंडळींची दृष्टी इतकी विकृत झालेली आहे, की स्त्रियांकडून समाजातील काही प्रश्न मांडले जात असतील तर ते त्यांच्या मेंदूपर्यंत पोहोचूच शकत नाहीत.

हे महाशय मोर्चाकरिता ३ वाजता मंडईत पोहोचले म्हणे! मोर्चाची वेळ ४ वाजण्याची जाहीर झालेली असताना, ३ वाजताच जागेवर पोहोचून, कोणी तोपर्यंत हजर नसल्याबद्दल टवाळखोरपणे लिहिणे, येथपासूनच पत्रलेखकाच्या उथळ दृष्टिकोनाची पहिली साक्ष पटते.

मोर्चा निघण्यापूर्वी ज्या स्वयंसेविकेने भाषण केले तिने, वाटलेल्या पत्रकातील प्रत्येक निषेधाचे वाक्य वाचून, तो निषेध करण्यामागचे कारण समजावून देण्याचा प्रयत्न केला होता. त्या भाषणातील कोणते तरी वाक्य संदर्भाशिवाय उचलून ते स्वतःच्या शब्दात मांडून पत्रलेखकाने त्याला कुचेष्टायुक्त पुरवणी जोडली आहे. याचा अर्थ त्या भाषणातील मजकूर समजून घेण्याचा प्रयत्न करण्याऐवजी 'आपल्याला टवाळी करण्याकरिता काय विषय मिळतो,' याच्याच शोधात हे गृहस्थ असले पाहिजेत.

'मग काही तरुण आले आणि स्त्रियांच्या दोनाच्या रांगा लागल्या' म्हणे! म्हणजे, त्या तरुणांनी का येऊन रांगा तयार केल्या?... सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे स्त्री-संघटनांबरोबरच इतर काही पुरोगामी संघटनाही या मोर्चासाठी आल्या होत्या, मोर्चाची वेळ झाल्यावर दोनाच्या रांगा तयार झाल्या!

ज्या प्रेक्षकांनी पोस्टर्स वाचली असतील आणि घोषणा नीट ऐकल्या असतील, त्यांना हे कळायला पाहिजे होते की, मोर्चा केवळ एका सिनेमाविरुद्ध नव्हता, तर आज स्त्रीला समाजात जे स्थान आहे, ते देणाऱ्यांच्या, तिला एक व्यक्ती न समजता वस्तू समजणाऱ्यांच्या विरुद्ध होता. मोर्चामध्ये अनेक प्रकारच्या संस्था–संघटनांचे प्रतिनिधी हजर होते. काहींचा निषेध केवळ नैतिक पातळीवर होता, तर काही जण या विषयाकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून बघत होते – ज्या समाजाचा 'काही तरी विकून त्यावर कोणत्याही मार्गाने नफा मिळविणे' हा स्थायीभाव झाला आहे, त्या समाजव्यवस्थेतच काही तरी मूलभूत चूक आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र स्त्रीच्या एकूण अप्रतिष्ठेच्या विरुद्धच निषेध करण्याबाबत सर्वांचे एकमत होते.

– एका हातगाडीवाल्याचे उद्गार (शहरातील बहुसंख्य लोकांच्या सिनेमावेडाच्या परिणामामुळे तो एकांगी दृष्टिकोण निर्माण झाला असेल) किंवा 'फियाट कारमधील पुरंध्री'चे उद्गार (जी समाजापासून अलग असे जीवन जगत असेल) किंवा शेवटी दिलेले काही उद्गार – अशा प्रकारच्या मनोवृत्तीच्या उगमाच्या कारणाचा विचार करून ते दूर करण्याचा प्रयत्न केला जावा हे उद्दिष्ट पत्रलेखकाच्या दृष्टीला दिसणे अशक्य होते, असे दिसते; परंतु हे उद्दिष्ट किंवा मोर्चा खरोखर कशाविरुद्ध आहे हे समजावून घेण्याचा प्रयत्न करणारेही 'पुण्याच्या पब्लिक'मध्ये बरेच भेटले.

[ गेल्या अंकात आलेल्या 'मुक्काम जयपूर : राजस्थान' या लेखाच्या शेवटी 'अपूर्ण' असे अनवधानाने छापले गेले आहे. –सं. ]

'मोर्चा होता त्यापेक्षा मोठा असल्याचा आभास निर्माण करण्याची आवश्यकता नव्हती.'

'कामगारचळवळीतले,' — 'मोर्चाचा अनुभव असलेले' फक्त पुरुषच मोर्चात होते असे प्रतिपादणे, हे पत्रलेखकाच्या अज्ञानाचे आणखी एक उदाहरण...मोर्चातील स्त्रियांमध्ये केवळ कामगारचळवळीचा अनुभव असलेल्या पांढरपेशा स्त्रियाच नव्हे, तर प्रत्यक्ष कामगारस्त्रियाही सामील होत्या.

पत्राच्या सुरुवातीला, या चित्रपटाबद्दल 'मलाही 'काही तरी' वाटत होते' असे म्हणणाऱ्याने, ते 'काही तरी' काय होते याचा शेवटपर्यंत पत्ता लागू दिलेला नाही.

२० जुलै डॉ. कल्पना जवळेकर, पुणे

# सत्यम् शिवम् सुंदरम् आणि पुणेरी ढोंग

□ काही गोष्टींना फारसे काही न करता भरपेट प्रसिद्धी मिळते. सांप्रत देशातील खाद्य तेल, अन्नधान्य परिस्थिती फारशी वाईट नसल्याकारणाने मध्यमवर्गीय 'महिला मंडळीय' महिलांना 'लाटणे', 'थाळी' यासारखे मोर्चे हाती (की पायी?) घेण्यास फारसा वाव नाही. तेव्हा 'स. शि. सुं.'च्या निर्मात्याचे आपण आभार मानून पुढे जाऊ या (मोर्च्याला).

सत्यम् शिवम् सुंदरम् या चित्रपटात झीनत अमन या ऑग्लाळलेल्या देहस्विनी कामिनीच्या भरपूर मांसल दर्शनाची लयलूट आहे. त्या प्रकारची पोस्टर्स जोगोजाग पादचाऱ्यांवर चालून येताना पुण्या-मुंबईत आढळतात. या मांसल देहप्रदर्शनाविषयी स्वतः झीनत अमनची तक्रार असल्याचे कुठे वाचण्यात (वा पाहण्यात!) आले नाही. अर्थात् बिचारी झीनत स्वतःच्या देहप्रदर्शनाविषयी 'न्यूट्रल' असली तरी तिच्या रूपाने यच्चयावत् स्त्रीदेहप्रदर्शनाचा अनावर संताप आलेल्या पुणेरी भगिनींना स्वस्थ बसून चालणार नाही. 'मोर्चा तो काढावा ग (यथावकाश) तो प्रसिद्धी पावतो ग! झीनतच्या रूपाने जे स्त्रीदेहप्रदर्शन चाललेले आहे, ते जणू काही काहीतरी नवीन असल्याच्या 'कोलंबसी' थाटात वावरणाऱ्या भगिनींची मीठमोहऱ्यांनी दृष्टच काढायला हवी (झीनतने!)

आज विशेषतः शहरात (पुणे व मुंबई) रस्तोरस्ती आढळणारे स्त्री-देहांचे जिवंत प्रदर्शन राजकपूरने चालविले आहे काय? (पहा: केसरी दि. १६-७-७८ मधील व्यंगचित्र) दाढीच्या ब्लेडपासून ते मिक्सरच्या जाहिरातीपर्यंत व 'स्वराज्य'च्या मुखपृष्ठापासून केसरीतल्या कामोत्तेजक चित्रपटांच्या जाहिरातीपर्यंत जे स्त्रीदेहाचे प्रदर्शन चालते, या सर्वांविरुद्ध मोर्चे काढावयाचे म्हटले तर पुणेरी महिलांची आयुष्ये हातात निषेधाच्या पाट्या फलक, व ओठात 'धिक्कार, मन साहिना' या अवस्थेत संपुष्टात येतील. विशेषतः 'शिक्षित तरुणींचे (सुशिक्षित / सुसंस्कृत नव्हे) रस्त्यातील वर्तन' हा कुठल्याही समाजशास्त्रज्ञाला आव्हान ठरावा, असा विषय आहे. पुरुषांसारखे वागण्यात-रस्त्यात बडबडणें, थुंकणे, खाणे, गप्पा मारीत थांबणे वगैरे-ज्यांना धन्यता वाटते त्यांना एखादी सत्यम् शिवम् सुंदरम्ची जाहिरात पाहिली. की स्वतःच्या स्त्रीत्वाची जाणीव व्हावी ना? पुरुषांचा Better haff (बेटर हाफ) होण्यापेक्षा, पुरुष असण्यातच—तसे पोशाख करून वगैरे – धन्यता मानणाऱ्या स्त्रिया जेव्हा झीनतचा देह पाहून अन्यायाची बांग देतात, तेव्हा हसावे की रडावे हा प्रश्न पडतो. ज्या शहरी स्त्रिया इंपोर्टेड साड्या, सेन्टसारख्या पुरुषाकर्षक' देहसजविणाऱ्या गोष्टींसाठी जिवाची कुरवंडी करतात, त्यांनीच 'पुरुषांनी आमचा बाजार मांडलाय' अशी ढोंगी आरोळी ठोकावी ना? म. फुले किंवा आगरकर स्वर्गात 'हेची काय फल मम तपाला?' म्हणून हताश होत असतील. विवाहासारख्या गोष्टीत ज्यांना स्वतःचा बाजार मांडलेला चालतो, त्यांनी चार कागदी / लाकडी पोस्टर्स पाहून बिचकावे ना? असे मोर्चे तर प्रत्येक चित्रपटाविरुद्ध काढायला हवेत, आहे का तुमची तयारी? प्रत्येक भारतीय चित्रपटात स्त्रीचा 'उपयोग' एखादी 'शोभेची वस्तु' किंवा 'उठाव' येण्यासाठी वापरायची पार्श्वभूमी म्हणून केलेला असतो. तेव्हा आजच एकदम असे काय झाले? ज्याप्रमाणे कुठला हिंदी चित्रपट Hit – (हिट्) होईल याचा Formula नाही, तसेच मराठी माणसे केव्हा मोर्चा काढतील त्याचाही नाही (संशोधकांनो, कराल का एकादी (पीएच्. डी.?) घाशीराम कोतवाल आला, काढ मोर्चा, सत्यम् शिवम् सुंदरम् आला, काढ 'सुंदरसा मोर्चा!'

भारतातील सुमारे ३०-३१ कोटी बायकांपैकी किती जणींची तुम्हाला सहानुभूती मिळेल? ८०% ग्रामीण भारतीय स्त्रियांसाठी त्यांच्या नग्न धिंडवड्याविरुद्ध किती वेळा काढले तुम्ही मोर्चे? जेव्हा तुमचे नवरे, किशोर मुलगे अर्धनग्न झीनतला पाहून 'चळतील' असे तुम्हाला वाटते, तेव्हा तुम्ही चवताळणार का? म्हणजे सोयिस्कर संताप हा. याला वेगळ्या भाषेत ढोंग म्हणतात!

या देशात लक्षावधी वेश्यांचे पुरुषरंजनासाठी अहोरात्र (विशेषतः शहरात) धिंडवडे निघतात त्यासाठी तुम्ही मोर्चे काढलेत काय? गावोगाव हरिजन-आदिवासी-दलित स्त्रियांवर झालेल्या नृशंस हल्ल्यांविरुद्ध किती मोर्चे काढलेत तुम्ही? परदुःख शीतल मानून वातानुकूलित समाजकारण करणाऱ्या तुम्ही! दारातच जेव्हा अर्धनग्न झीनतचे पोस्टर लटकले तेव्हा बिचकलात तुम्ही! एवढा भाबडा ढोंगीपणा शिकून-सवरून शोभणारा नाही. १९७५सालच्या आंतरराष्ट्रीय महिलावर्षात मी स्वतः इंदिरा गांधींना पत्र लिहून वेश्यांना स्त्रिया म्हणून प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी प्रयत्न व्हावेत असे सुचविले. प्रथम उत्तर नाही. मी पिच्छा पुरविल्यावर उत्तर आले की, 'आम्ही ते करणार आहोत!' ४ वर्षे उलटून गेली. अजून त्या करतातच आहेत. जेव्हा मी पुणेरी भेळीसारख्या खमंग मोर्चाची बातमी वाचली तेव्हा माझी करमणूक झाली. एखाद्या चित्रपटातील मांसल स्त्रीदेह-प्रदर्शनाविरुद्ध मोर्चा काढला कीसंपले का? संतोषी 'माँ?' विरुद्ध का नाही मोर्चा काढला? कारण अकारण भाबड्या गोष्टीही तितक्याच अश्लाघ्य, बीभत्स असतात. 'देवदेवस्त्री' हा आपल्या परंपरेचा भाग म्हणून आपण गप्प बसतो का?

चित्रपट-नट्यांसारखे नटण्या-मुरडण्यात ज्या शहरी तरुणींना धन्यता वाटते, त्यांनी मोर्चे काढणे हा 'टोटल' विनोदी प्रकार वाटतो. खरा प्रकार वर म्हटल्याप्रमाणे आहे. तो हा की, 'आपली 'पुरुषमाणसे' असला चित्रपट पाहून बिघडू नयेत, इतरत्र काय चालते ते चालू द्या.' हा घनघोर स्वार्थ यामागे स्पष्ट दिसून येतो.

शिवाय मधूनच एखादा मोर्चा काढला की, समाजातील-विशेषतः पुरुषांतील-अनिष्ट प्रवृत्तींना पायबंद बसतो काय? यासाठी परिवर्तनाची शिस्तबद्ध मोहीम-मोर्चा नव्हे-हाती घ्यावा लागेल. या मोर्चामुळे एकच गोष्ट होते, ती ही की, जे 'सशिसुं' पाहणार नसतील, तेही काय आहे बुवा एवढे त्यात, असे म्हणत म्हणत गर्दीत घुसतील. पुणेरी महिलांच्या मोर्चामुळे चित्रपटावर अनिष्ट परिणाम होण्याऐवजी 'गल्लानिष्ठ' परिणाम घडण्याचीच अधिक शक्यता आहे. बंदी घातलेली कादंबरी अधिक खपते, त्याच तालावर विरोधी मोर्चा निघालेला चित्रपट अधिक चालतो, असे समीकरण व्हायला नको असेल तर पुणेरी भगिनींनी यापेक्षा ठोस, भरीव कृती करण्याची आवश्यकता आहे.

११ जुलै प्रा. गोपाळदत्त कुलकर्णी, नासिक

राजधानी दिल्ली । प्रतिनिधी

# ' भारत वाचवा ' म्हणजे ' मला वाचवा ! '

गेल्या ९ ऑगस्टला 'भारत वाचवा दिन' पाळण्याचे आवाहन इंदिरा गांधी यांनी आपल्या अनुयायांना केले आहे. त्यासाठी त्यांनी नुकतीच दिल्लीतील आपल्या कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली होती आणि अशा तऱ्हेच्या बैठकी ठिकठिकाणी आयोजित करण्यासाठी देशभर दौरा काढण्याचा आपला मनोदय व्यक्त केला. आपण म्हणजे भारत असे इंदिरा गांधी खरोखरच मानीत असल्यामुळे स्वतःला वाचविण्यासाठी सुरू करण्यात येणाऱ्या मोहिमेशी त्यांनी साऱ्या देशाचे नाव निगडित करावे हे ओघानेच येते. जनता पक्षाच्या राजवटीच्या रूपाने देशावर फार मोठे संकट आलेले आहे, इतकेच नव्हे तर देशाचे स्वातंत्र्यही धोक्यात आलेले आहे, असा कांगावा करून इंदिरा गांधी आपल्या हस्तकांना जनता पक्षाविरुद्ध आंदोलन सुरू करण्यासाठी चिथावीत आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, इंदिरा गांधी यांच्या हुकूमशाहीनेच देशावर भलते संकट आणले होते. त्यांच्या आणीबाणीने लोकांचे स्वातंत्र्य पार गुंडाळून ठेवले होते. त्यामुळे गेल्या वर्षीच्या मार्चमधील निवडणुकीत इंदिरा गांधी यांचा पराभव झाल्यानंतर लोकांना त्यांची स्वातंत्र्ये पुन्हा प्राप्त झाली. जनता सरकारचे धुरीण अननुभवामुळे किंवा अती-उत्साहामुळे काही चुका करीत असतील, परंतु त्यांनी देशाला पुन्हा एकदा लोकशाहीच्या खुल्या वातावरणामध्ये प्रविष्ट केले हे कोणालाच नाकारता येणार नाही. त्यामुळे देशावर संकट वगैरे आलेले आहे ही इंदिरा गांधींची भाषा झूट आहे. आता त्यांना काळजी लागली आहे ती स्वतःची.

शहा आयोगाने सादर केलेल्या दोन अहवालांच्या आधारे त्यांच्यावर खटले भरण्याची सारी प्राथमिक तयारी पूर्ण झालेली आहे. हे खटले नेहमीच्या पद्धतीप्रमाणे सुरुवातीस दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात दाखल केले तर ते सत्र न्यायालय, उच्च न्यायालय आणि उच्चतम न्यायालय या मार्गाने जाऊन निकाल लागायला बरीच वर्षे जावी लागतील, म्हणून हे खटले चालविण्यासाठी एक खास न्यायालय स्थापन करावे असा केंद्र सरकारचा विचार असून त्याबाबत कोणताही धोका पत्करायला नको म्हणून त्या बाबतीत सरकारने उच्चतम न्यायालयाचा सल्ला घेण्याचे ठरविले आहे.

### घाईचे कारण

उच्चतम न्यायालयाकडून अनुज्ञा मिळताच उच्च न्यायालयातील एक किंवा दोन न्यायमूर्तींची खास न्यायालय म्हणून नेमणूक होईल. या खास न्यायालयाकडे इंदिरा गांधींवरील खटले हेच काम राहणार असल्यामुळे त्याच्याकडून निकाल द्यायला फारसा वेळ लागणार नाही. तो निर्णय इंदिरा गांधींना असमाधानकारक वाटला तर त्यांना त्याविरुद्ध प्रथम मुख्य न्यायालयाच्या खंडपीठाकडे आणि शेवटी उच्चतम न्यायालयाकडे दाद मागता येईल. या खटल्यातून आपली मुक्तता होण्याची इंदिरा गांधींना खात्री वाटत नसल्यामुळेच त्यांनी जनतेला 'भारत वाचवा-दिन' पाळण्याची विनंती केली आहे. ते त्यांचे नेहमीचेच तंत्र आहे. आपले अधिकारपद ज्या ज्या वेळी धोक्यात आले त्या प्रत्येक वेळी इंदिरा गांधींनी देश संकटात आल्याचा कांगावा केला होता. त्या वेळी त्या पंतप्रधान होत्या आणि त्यामुळे कधी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून तर कधी आणीबाणी पुकारून त्यांना वेळ निभावून नेता आली. खास न्यायालयाच्या कल्पनेमुळे इंदिरा गांधी या वेळी चिंताक्रांत झालेल्या आहेत, याचे कारण लोकांना भडकाविण्याखेरीज त्यांच्यापाशी दुसरा कोणताही आधार उरलेला नाही. इंदिरा गांधी आता बदललेल्या आहेत, अशी ग्वाही सी. सुब्रह्मण्यम किंवा वसंतराव नाईक भले देवोत, भारतावर राज्य करण्यासाठीच नेहरू घराणे अवतीर्ण झालेले आहे या इंदिरा गांधींच्या समजुतीत किंचितही बदल झालेला नाही ! म्हणूनच, आपले राजकीय भवितव्य पूर्ण नष्ट करण्याची शक्यता असलेला खटला उभा राहण्यापूर्वीच त्यांना साऱ्या देशभर प्रक्षुब्ध जनआंदोलनाचा प्रयोग करून पाहण्याची घाई झालेली आहे.

इंदिरा गांधींना अटक करण्यात आली तर आपण रस्त्यांवर येऊ, अशी धमकी त्यांचे हस्तक देत आहेत. आंध्रप्रदेश आणि कर्नाटक येथील शासनयंत्रणा या हस्तकांच्या ताब्यात असल्यामुळे तिच्या आधारे कदाचित त्यांना हैद्राबाद, बंगलोर अशा काही थोड्या ठिकाणी गोंधळ घालता येईल. अन्य शहरांमध्ये मात्र या आंदोलनाला, इंदिरा गांधींना अभिप्रेत असलेला पाठिंबा मिळणार नाही. त्यांना तशी नागरी भागाची पर्वाही नाही. हरिजन, गिरिजन आणि मुसलमान या समाजघटकांना आपल्यासंबंधी जवळीक वाटते हे इंदिरा गांधींना ठाऊक आहे. गेल्या वर्षीच्या मार्चमधल्या निवडणुकीच्या वेळी या अल्पसंख्यांक समाजघटकांनी नेहमीप्रमाणे काँग्रेसचा पाठपुरावा न करता, जनता पक्षाच्या विजयाला आपला हातभार लावला होता. त्या वेळी निर्माण झालेले सामाजिक अभिसरणाचे वातावरण टिकवून धरणे जनता पक्षाला जमू शकले नाही. याला मुख्यतः कारणीभूत ठरली ती चरणसिंगांची मुद्दाम वक्तव्ये. उत्तरप्रदेश किंवा बिहार येथील हरिजनांवर करण्यात आलेल्या अत्याचारांच्या बातम्या दिल्लीत येऊन पोहोचताच या केंद्रीय गृहमंत्र्याने त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती मिळविली असती आणि गुन्हेगारांना शासन करण्यासंबंधी कर्पुरी ठाकूर आणि रामनरेश यादव या आपल्या मंडळींना सांगितले असते तर जनता पक्षाच्या रूपाने आपल्याला खरोखरच वाली लाभला आहे असे हरिजनांना वाटले असते. तसे करण्याऐवजी चरणसिंगांनी या अत्याचारांच्या गांभीर्याची उपेक्षाच केली. निष्फळ आकडेवारी देऊन, काँग्रेसच्या राजवटीत हरिजनांची अवस्था कशी होती हे दाखवून देण्यावरच त्यांचा भर होता. त्यामुळे

कदाचित काँग्रेसला हरिजनांसंबंधी जिव्हाळा वाटत नव्हता हे सिद्ध होईल, परंतु जनता पक्षाला ही सामाजिक समस्या महत्त्वाची वाटत आहे असे त्यामुळे प्रतीत होऊ शकले नाही. बेलछी या बिहारमधल्या दुर्गम खेड्यामध्ये नुसते जाऊन येणे हे देखील महत्त्वाचे ठरते हे राजकीय शहाणपण, नागरी भागात वाढलेल्या इंदिरा गांधींशी आहे. आपण ग्रामीण जनतेचे नेते आहोत असे मानणाऱ्या आणि सांगणाऱ्या चरणसिंगांना मात्र दिल्लीत बसूनच माहिती गोळा करणे पुरेसे वाटले.

आणीबाणीतील अतिरेकांमुळे आपल्याला प्रथमच ग्रामीण भागात स्थान लाभलेले आहे हे माहीत असूनही सत्तेच्या झुंजीत गुंग झालेल्या जनता नेत्यांना ते स्थान टिकविता आले नाही हे कर्नाल आणि आझमगढ येथील पोटनिवडणुकांनी दाखवून दिले. त्यानंतरही या परिस्थितीत सुधारणा झाली नाही. उत्तरप्रदेशाच्या ग्रामीण भागातील उपेक्षित दलितवर्गाला आपल्यासंबंधी जिव्हाळा वाटू लागेल या दृष्टीने कार्य करण्याऐवजी चरणसिंग आणि त्यांचे सहकारी मोरारजी देसाई आणि चंद्रशेखर यांचे वाभाडे काढण्यात दंग झाले. मध्यंतरी जाहीर रीतीने झडून गेलेल्या देसाई–चरणसिंग–वादामुळे, या पक्षाची विश्वसनीयता बऱ्याच प्रमाणात कमी झाली आणि या बदललेल्या परिस्थितीचा फायदा उठविण्यासाठीच इंदिरा गांधी 'भारत वाचवा'ची हाक देत आहेत.

## आयोगाची स्थापना

या पार्श्वभूमीवर मोरारजी देसाई यांनी बोलाविलेली सर्वपक्षीय नेत्यांची बैठक ही एक आशादायक घटना ठरते. इंदिरा गांधी ज्या वेळेला आपल्या अनुयायांचे बौद्धिक घेत होत्या त्याच वेळेला संसदभवनातील पंतप्रधानांच्या कचेरीमध्ये हरिजनांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक कशी करता येईल या दृष्टीने मोरारजी देसाई विरोधी नेत्यांशी विचारविनिमय करीत होते. चरणसिंगांच्या राजीनाम्यामुळे सध्या गृहखाते मोरारजीभाईंकडे आलेले आहे. वर्षभरात चरणसिंगांनी जे केले नाही त्याचा प्रारंभ मोरारजीभाईंनी या बैठकीच्या रूपाने केलेला आहे. हरिजनांवर अत्याचार झालेला आहे असे कळताच सर्वपक्षीय संसदीय समितीने त्या ठिकाणाला भेट द्यावी आणि खरा प्रकार काय आहे हे समक्ष जाणून घेऊन त्या अनुरोधाने पुढील उपाययोजना करावी, याबद्दल या बैठकीत एकमत झाले. त्यामुळे यापुढे इंदिरा गांधींना हरिजनांवर होणाऱ्या अन्यायांचे राजकीय भांडवल करता येणार नाही. सर्वपक्षीय संसदीय समितीच्या शिफारशीनुसार उपाय योजिले जाणार असल्यामुळे, गुन्हेगार कोणत्या पक्षाचा आहे याचा विचार केला जाणार नाही अशी अपेक्षा निर्माण झालेली आहे.जनता पक्षाच्या कारकीर्दीमध्ये अशांतता वाढलेली आहे, लोकांचे जीवितवित्त सुरक्षित राहिलेले नाही, असेही इंदिरा गांधींनी 'भारत वाचवा' दिनाचे आणखी एक कारण पुढे केले आहे. मोरारजीभाईंनी बोलाविलेल्या बैठकीत या समस्येचाही विचार झाला. जातीय दंगली, विद्यार्थ्यांमधील असंतोष आणि कामगारांची आंदोलने यामुळे शांततेला तडा जातो. म्हणून हरिजनांवरील अत्याचारांच्या प्रश्नाप्रमाणे हे तीन प्रश्नही सर्वपक्षीय सहमतीने सोडविण्याचे मोरारजीभाईंनी आवाहन केले आहे. या दीड तासाच्या बैठकीमध्ये सर्वांगीण विचार घेणे शक्यच नव्हते. म्हणून आणखी दहा-पंधरा दिवसांनी पुन्हा आपण अशी बैठक घेणार असल्याचे मोरारजीभाईंनी आश्वासन दिलेले आहे. समाजजीवनाला व्यापून टाकणाऱ्या समस्येसंबंधी अशा तऱ्हेने सर्वपक्षीय विचार आणि उपाय होत गेला तर त्यांचा हळूहळू पण निश्चितपणे निचरा होत जाईल. या दृष्टीने पहिले पाऊल म्हणजे या बैठकीच्या पाठोपाठ अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या समस्यांचा विचार करण्यासाठी आयोग नेमण्यात आल्याची घोषणा. घटनेने हरिजनांना जे अधिकार दिलेले आहेत ते त्यांना उपभोगता येतात की नाही हे पाहण्याचे कार्य हा आयोग करील. त्याचप्रमाणे या मागासवर्गीयांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने कोणत्या तरतुदी केल्या पाहिजेत याचेही या आयोगाकडून केंद्र सरकारला मार्गदर्शन लाभणार आहे. राज्यसभेतील काँग्रेस पक्षाचे नेते भोला पास्वान शास्त्री यांची या आयोगाने अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे हा प्रश्न पक्षीय परिघापेक्षा आपण व्यापक मानतो हेही मोरारजीभाईंनी दाखवून दिले आहे.

जनता पक्ष काही तरी विधायक कार्य करण्याच्या प्रयत्नात आहे, असे सर्वपक्षीय बैठकीमुळे आणि आयोगाच्या नेमणुकीमुळे दिसून येत असतानाच, या पक्षातील अंतर्गत फूट अजूनही नाहीशी झालेली नाही, याचा दुसऱ्या दिवशीच प्रत्यय आला. संसदीय जनता पक्षाच्या कार्यकारिणीची निवडणूक चौथ्यांदा पुढे ढकलण्यात आली. वस्तुत: ही निवडणूक मेच्या उत्तरार्धातच होणार होती; परंतु तत्पूर्वी चरणसिंग यांनी केंद्रीय कार्यकारिणीचा आणि संसदीय मंडळाचा राजीनामा दिल्यामुळे त्या वेळी ही निवडणूक पुढे ढकलण्यात आली. मध्यंतरीच्या काळात मोरारजी देसाई आणि चरणसिंग यांच्यातील दुरावा इतका वाढला की त्याची चरणसिंगांच्या राजीनाम्यात परिणती झाली. चरणसिंग केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये नसताना संसदीय पक्षाच्या कार्यकारिणीची निवडणूक घेतली तर त्यांच्या भारतीय लोकदलाला यश मिळण्याची मुळीच शक्यता नसल्यामुळे, चरणसिंग आणि मोरारजीभाई यांच्यात समझोता घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणारे बाजपेयी, फर्नांडिस आणि पटनाईक यांनी ही निवडणूक पुढे ढकलावी अशी मोरारजीभाईंना विनंती केली. 'ठरल्याप्रमाणे निवडणूक झालीच पाहिजे,' हा आपला आग्रह मोरारजीभाईंनी पुन्हा व्यक्त करताच ते आणि बाजपेयी यांच्यात खटका उडाला. आपल्या ज्या सहकाऱ्यांच्या कार्यक्षमतेसंबंधी मोरारजीभाईंना आदर आहे त्यात बाजपेयी यांचा समावेश होतो. मोरारजीभाईंचा निवडणुकीसंबंधीचा आग्रह समजण्यासारखा असला तरी, पक्षातील दुभंगलेली एकता साध्य करण्याच्या दृष्टीनेच बाजपेयींनी तशी सूचना केली होती हेही लक्षात घेतले पाहिजे. बाजपेयी यांनी दिलगिरी व्यक्त केल्यानंतर मोरारजीभाईंनीही निवडणूक पुढे ढकलायला संमती देऊन हा पेचप्रसंग आपल्याला बिकट करावयाचा नाही याची प्रचीती आणून दिली. बाजपेयी, फर्नांडिस आणि पटनाईक यांची पक्षैक्य अभंग राखण्याच्या दृष्टीने सुरू असलेली धडपड आणि या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांना प्रतिसाद देण्याची मोरारजीभाईंनी दाखविलेली तयारी यांचा आदर करण्याचा समंजसपणा चरणसिंगांनी दाखविला तरच पक्षहिताची आपल्यालाही कळकळ आहे, हा त्यांच्या वक्तव्याला अर्थ प्राप्त होईल.... □

# महाराष्ट्रातील सत्तान्तर : अगोदर आणि नंतर

माहितगार

'आता कुठे युद्धाला तोंड फुटले आहे. आम्ही विजयी झाल्याशिवाय ते संपणार नाही!' असे वसंतराव पाटील यांनी सिंहासनावरून खाली येताच बोलून दाखवले. वसंतराव पाटील केवळ बोलूनच थांबणाऱ्यांपैकी नाहीत. ते सतत कारवाया करीत राहतील हे निश्चित! पण या वेळी त्यांचे राजकारण यशस्वी होईल का, हा प्रश्न आहे. 'आपण शरद पवार यांचे मंत्रिमंडळ पाडल्याशिवाय राहणार नाही!' असे ते म्हणतात आणि नव्या पुरोगामी लोकशाही आघाडीतील सदतीस आमदार आपल्याला येऊन मिळतील असा विश्वासही ते व्यक्त करतात. आमदारांच्या संख्येचे गणित पुढे सोडवीत आहे; परंतु दादांचे नवे गणित मात्र चुकणार आहे. या वेळी दादांचे गणित पहिल्यापासूनच चुकत गेले, त्यामुळेच त्यांचे सरकार गडगडले आहे. ज्या भोयांच्या खांद्यावर दादांची पालखी होती त्या भोयांना दादांसारखा माणूस ओळखू शकला नाही असे म्हणावे लागते! यात दादांची काही तरी गफलत झाली असे म्हणावे लागेल किंवा भोयांनी कौशल्य पणाला लावून दादांना गाफील ठेवले असे म्हणावे लागेल.

राजकारण बदलले, त्यातील काही व्यक्ती बदलल्या आणि काहींना कमी-अधिक महत्त्व आले; परंतु घटनाक्रम कायम राहिला आहे. त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ते दिले की, महाराष्ट्रातील सध्याच्या घडामोडींचा अर्थ लावणे सोपे होईल.

यशवंतराव चव्हाण यांना डावलून वसंतराव नाईक इंदिरा गांधींच्या मदतीने राजकारण करू लागले त्या वेळी वसंतराव नाईक यांची उचलबांगडी झाली आणि शंकरराव चव्हाण यांना त्यांच्या जागी आणले गेले. नाइकांची उचलबांगडी करून शंकरराव चव्हाण यांची पालखी उचलण्याचे काम करणारे कोण होते? शरद पवार, गोविंदराव आदिक, प्रतापराव भोसले आदी यशवंतराव चव्हाण यांच्यावर निष्ठा असणारे लोक यात पुढे होते. शंकरराव चव्हाण यांनीही यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्रात इंदिरा गांधी यांच्या आशीर्वादाने संपवण्याचे प्रयत्न व सहकारक्षेत्रातील गैरव्यवहाराला आळा घालणारे उपाय योजण्यास सुरुवात केली. तेव्हा हितसंबंध धोक्यात आलेली मंडळी यशवंतराव चव्हाण यांच्यामागे एकवटली. लोकसभा-निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला त्याचे निमित्त करून यशवंतराव चव्हाण यांचे लोक व ज्यांचे हितसंबंध धोक्यात आले होते असे हितसंबंधित एकत्र आले आणि त्यांनी शंकररावांना दूर केले. नाइकांना काढण्यासाठी वातावरण तयार करणारी मंडळीच शंकररावांना काढण्यासाठी पुढे होती. विधानसभा-निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. लोकसभेच्या पराभवाचे खापर शंकरराव चव्हाण यांच्यावर फोडले; पण विधानसभेच्या निवडणुकीच्या पराभवाचे खापर वसंतराव पाटील यांच्या माथ्यावर काँग्रेसजनांनी फोडलेले नाही. याची कारणे दोन. एक : महाराष्ट्रातील पहिले संमिश्र सरकार येईपर्यंत वसंतराव पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधात पवित्रा घेतला नव्हता. दोन : हितसंबंधितांना आपले हित कोणामुळे सुरक्षित राहणार आहे याची जाणीव असल्याने हितसंबंधितांनी दादांच्या मागे आपली 'शक्ती' कायम ठेवली होती. ही दोन कारणे असल्यामुळेच विधानसभा-निवडणुकीच्या पराभवाचे भांडवल दादांविरुद्ध उभे करण्यात आले नाही.

यशवंतराव चव्हाण यांना काँग्रेस आयबरोबर संयुक्त सरकार स्थापणे पसंत नव्हते तरीही 'दादा माझा 'वीक पॉइंट' आहे, त्यांना एक टर्म पुरी करू द्यावी' असे म्हणत यशवंतरावांनी संयुक्त सरकारला मान्यता दिली. संयुक्त सरकारच्या स्थापनेनंतर वसंतराव पाटील, वसंतराव नाईक यांनी दोन्ही काँग्रेसच्या एकीकरणाचा प्रयत्न काँग्रेसधोरणाच्या विरुद्ध जाऊन सुरू केला. एकीकरणाला यशवंतरावांचा विरोध आहे, त्यामुळे त्यांचे राजकीय आसन नेस्तनाबूत केले की एकीकरणाचा अडसर दूर होणार होता. म्हणून त्यांना 'संपविण्या'चे प्रयत्न इंदिरा गांधींच्या इच्छेनुसार सुरू झाले. वसंतराव नाईक यशवंतरावांविषयी अतिशय कडवटपणे बोलतात. 'यशवंतराव आपल्यापुरतेच पाहतात, एखादी घटना घडून गेली की त्या घटनेला तात्त्विक मुलामा देऊन आपल्या भूमिकेचे समर्थन करतात, पण घटना घडत असताना ते कुंपणावर बसतात' असे नाईक यशवंतरावांविषयी बोलतात.

वसंतराव नाईक यांना राज्यात फारसे स्थान राहिले नाही. त्यामुळे त्यांच्या कारवाया राजनीतीच्या कारवाया ठरत. अनुयायांचे पाठबळ त्यांच्यापाशी राहिलेले नाही. अनुयायी असलेले यशवंतरावांच्या नंतरचे नेतृत्व वसंतरावदादा पाटील यांच्याकडे आहे. नाईकांनी दादांना जवळ करून यशवंतराव चव्हाण यांना निकालात काढावयाचा कट केला तेव्हा महाराष्ट्रातील राजकारणाने उचल खाल्ली! यशवंतरावांनी गेल्या दोन-तीन महिन्यांत आपल्या माणसांची चाचपणी केली व पुढचे डाव आखले. यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे शंकरराव चव्हाण यांचे वारस ठरलेले वसंतराव पाटील ज्या मार्गाने आले त्याच मार्गाने गेले!

महाराष्ट्रात सत्ताबदल घडवून आणण्याचा प्रयत्न दिल्लीत यशवंतराव चव्हाण व मधु लिमये करीत होते तेव्हा आपल्याला मुख्यमंत्रिपद मिळत नाही म्हणून वसंतराव पाटील यांनाच जनताचा पाठिंबा देऊन दिल्लीत चाललेले प्रयत्न उधळून लावण्याचा प्रयत्न

उत्तमराव पाटील यांनी करून पाहिला. मात्र त्या प्रयत्नांना यश आले नाही.

## पवार गटाच्या हालचाली

शरद पवार व त्यांच्या गटाने एकीकरणाविरुद्ध भूमिका घेतली व १० जुलै १९७८ च्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीनंतर एकीकरणाचे प्रयत्न थांबविले नाहीत तर आम्हाला वेगळा विचार करावा लागेल अशा निवेदनावर सह्या घेण्याची मोहीम पवार गटाच्या आमदारांनी सुरू केली. निवेदनावर एकत्रित सह्या झाल्या त्या वेळी वसंतराव पाटील यांनी ६ जुलै १९७८ विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या बैठकीत 'आपण यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व न मानणाऱ्यांपैकी नाही' असे पाठीमागून घाव घेण्याचा प्रकार करावा तसे कसरत करीत विधान केले. त्याआधी दोन दिवस त्यांनी आपण एकीकरणाचा प्रयत्न सोडून दिला आहे असे पिल्लू सोडून दिले.

एकीकरणाच्या प्रयत्नाचे निमित्त करून आमदार आपल्या विरुद्ध सह्यांची मोहीम काढीत आहेत तर आपणच एकीकरणाचे प्रयत्न बंद केले असे जाहीर केल्यानंतर मोहीम कोणाविरुद्ध काढली जाईल ? असा धूर्तपणाचा विचार करून दादांनी नवा पवित्रा घेतला. त्याच वेळी त्यांनी वसंतराव नाईक यांना एकीकरणाचा प्रयत्न चालू ठेवण्यास सांगितले. ६ जुलै १९७८ च्या विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या बैठकीत दादांनी आपल्या विरोधकांनाच 'यशवंतरावांना पाठिंबा देणारे पत्रक कोठे आहे ? मलाही त्यावर सही करावयाची आहे' असे सांगून सिक्सरच मारली ! एकीकरणाचे प्रयत्न सोडून दिल्याचे दादांनी जाहीर केल्यामुळे मोहीमवीरांना दादांविरुद्ध नवा डाव खेळावा लागला. काँग्रेस आय. काँग्रेसला संपविण्यास निघाली आहे. काँग्रेस आय. लोकशाहीविरोधी असल्याने तिच्याबरोबरचे संबंध तोडून लोकशाहीवादी शक्ती एकत्र आल्या पाहिजेत असा पवित्रा पवार गटाने घेतला.

वसंतराव पाटील यांचे सरकार पडणार अशी चर्चा विधानसभेच्या आवारात फार मोठ्या प्रमाणावर चालू होती. त्याच वेळी दिल्लीहून दादांचे मंत्रिमंडळ कोसळणार अशी बातमी आली. आपले मंत्रिमंडळ कोसळणार नाही, वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्या खोडसाळ आहेत, असा खुलासा करण्यात आला. दादांनी ११ जुलै १९७८ रोजी हा खुलासा केला. त्याच दिवशी शरद पवार दादांना भेटले. 'माझा तुम्हालाच पाठिंबा आहे. आपण दोघेही उद्या संयुक्त निवेदन प्रसिद्ध करू या' असे पवार यांनी दादांना त्या दिवशी सांगितले. इतकेच नव्हे तर दादा–तिरपुडे यांची चमचेगिरी करणाऱ्या एकादोघा वार्ताहरांजवळही पवार यांनी मी व दादा उद्या ( १२ जुलै १९७८ ) निवेदन करणार आहोत अशी हूल उठवून दिली. त्याचा परिणाम झाला आणि दादांनाही पवार यांच्या हालचालींचा पत्ता लागला नाही.

११ जुलै रोजी रात्री शरद पवार यांच्यावरोबर मी गेलो आणि दोन मंत्री राजिनामा देणार आहेत असे त्यांना म्हणालो. तेव्हा त्यांनी ती बातमी देऊ नकोस. ऑफ द रेकॉर्ड ठेव असे सांगून माझ्या माहितीला दुजोरा दिला. दुसऱ्या दिवशी १२ जुलै १९७८ रोजी शरद पवार, सुंदरराव सोळंके, सुशीलकुमार शिंदे, दत्ता मेघे ह्या मंत्र्यांनी राजिनामे दिले. त्यांना पाठिंबा देऊन दादांचा पाठिंबा काढून घेतला असे सुमारे चाळीस आमदारांनी राज्यपालांना पत्र दिले. त्यानंतर राज्यातील चित्र स्पष्ट झाले. दादांचे मंत्रिमंडळ राहात नाही. काँग्रेस कार्यकारिणीने १६ जुलै १९७८ रोजी संयुक्त मंत्रिमंडळ तोडावे व एकीकरणाची बोलणी बंद करावीत आणि जनताबरोबर सरकार स्थापू नये असा निर्णय कार्यकारिणीने घेतला. कार्यकारिणीने निर्णय घेईपर्यंत गोष्टी एवढ्या पुढे गेल्या होत्या की, पवार गटाला कार्यकारिणीच्या निर्णयाविरुद्ध बंड करण्याशिवाय दुसरा मार्ग राहिला नव्हता. १६ जुलै रोजी पवार यांच्या घरी मध्यरात्रीपर्यंत बैठक झाली त्याच वेळी काँग्रेसमधून आपण होऊन बाहेर पडावयाचे नाही; पण स्वतंत्र विधिमंडळ गटाची स्थापना करण्याचे जवळजवळ नक्की केले. १७ जुलै रोजी सायंकाळी पवार यांनी सर्व सहकाऱ्यांशी तीन तास चर्चा केल्यानंतर हा निर्णय जाहीर केला.

पवार यांच्या बंडासंबंधी वसंतराव पाटील म्हणाले, 'यशवंतराव चव्हाण यांचे देशातील राजकारणातील स्थान संपले आहे. महाराष्ट्रातूनही ते संपू नये म्हणून यशवंतरावांनी माझे सरकार पाडले आहे.'

यशवंतरावांविरुद्ध जे गेले ते महाराष्ट्रात सत्तेमधून उखडले आहेत असेच दिसून येते. याचा खरा अर्थ असा आहे की, महाराष्ट्रात काँग्रेसच्या राजकारणात यशवंतरावांची पाळेमुळे खोलवर रुजली आहेत. त्यांना धक्का लागला असला तरी मूळची पकड त्यांच्या राजकारणाच्या मुळांनी सोडलेली नाही. दादांना बाजूला सारण्यासाठी पुढे आलेल्या मंडळींनीच दादांना सत्तेच्या सोपानावर चढविले होते. त्यांनी तो काढून घेताच दादा गडगडले आहेत.

महाराष्ट्रात यशवंतरावांनी आपले अस्तित्व कायम आहे हे दादा व नाईक यांना दाखवून दिले आहे; परंतु पवार गटाने जी भूमिका घेतली आहे ती पाहता त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून त्या गटाला बाहेर काढले जाईल. त्यामुळे काही काळपर्यंत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र काँग्रेसमध्ये एकाकी पडतील; परंतु सत्तेवर असलेला गट यशवंतराव यांनाच मानणारा असल्याने यशवंतराव महाराष्ट्रातून संपणार नाहीत असेच म्हणावे लागेल.

जनता पक्षाबरोबर सरकार स्थापून शरद पवार कोणता डाव साधतील हेही पाहिले पाहिजे. पवार यांच्याजवळ आज काँग्रेसमधील पन्नास आमदार आहेत. काही महिन्यांत ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.

आमदारांची वाढीव संख्या व सत्तेच्या जोरावर आपले राजकारण मजबूत करण्यावर मुख्यमंत्री पवार यांचा भर राहील. विदर्भ–मराठवाडा भागात आपले मूळ रोवायचे हा त्यांचा प्रयत्न राहील. दरम्यान काँग्रेस आय.चे शासन आणखी खिळखिळे होईल अशी परिस्थिती निर्माण होऊन निवडणुकीमध्ये आपल्याला बहुमत प्राप्त होईल अशी खात्री वाटेल तेव्हा मुख्यमंत्री शरद पवार दोन वर्षांच्या कालावधीत निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी दर्शविण्याची शक्यता आहे.

दुसरी शक्यता अशीही दिसते की, महाराष्ट्रात जनता पक्षाबरोबर सरकार स्थापन केल्याने पूर्वाश्रमीच्या जनसंघाला आळा बसला

जाणार आहे. जनता पक्षात जनसंघ घटक वरचढ होऊ नये म्हणून काँग्रेसमधील लोकांचे जनता पक्षाबरोबरचे सहकार्य वाढतही जाईल !

### 'जनता 'चे हानिलाभ

पवार यांच्या सरकारमुळे जनता पक्षाचा लाभ कोणता झाला असेल तर त्या पक्षाची जागा बदलली. त्यांचे काही आमदार मंत्री झाले ! परंतु जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या जनसंघाने व त्यांचे नेते उत्तमराव पाटील यांनी मीच मुख्यमंत्री होणार हा हट्ट धरला नसता तर चार महिन्यांपूर्वीच जनता पक्षाचा मुख्यमंत्री असलेले केवळ जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले असते. आपला ताबा पक्ष व सरकारवर ठेवावयाच्या जनसंघाच्या हट्टामुळे व अदूरदर्शी राजकारणामुळे जनता पक्षाला आता शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये सामील व्हावे लागले आहे. उत्तमराव पाटील व त्यांच्या जनसंघाने चार महिन्यांपूर्वी शहाणपणा दाखविला असता तर उत्तमराव पाटील उपमुख्यमंत्री म्हणून वावरले असते. आज साधे मंत्री म्हणून सरकारात दाखल होण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला आहे. गाढवही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले अशी अवस्था पूर्वाश्रमीच्या जनसंघवाल्यांची झाली आहे. इतकेच काय पण एस्. एम्. जोशी शेतकरी कामगार पक्षाला साठ जागा देण्यास तयार झाले होते त्याला विरोध केला आणि हात दाखवून अवलक्षण करून घेतले. शे का. पक्षाला ६० जागा दिल्या असत्या तर ३०–३५ जागा शे. का. पक्षाने जिंकल्या असत्या आणि जनता व शे. का. पक्ष यांचे सरकार सत्तेवर आले असते. २५–३० जणांच्या मंत्रिमंडळात शे. का. पक्षाला १०–१२ मंत्रिपदे गेली असती व १८–२० मंत्रिपदे जनता पक्षाच्या वाटयाला आली असती. एस्. एम्. जोशी यांच्या तोडग्याला विरोध करून या लोकांनी कोणते राजकारण खेळले ? काँग्रेसच्या पन्नास आमदारांना सत्तेत वाटेकरी करून घेतले. आता २५–३० जणांच्या मंत्रिमंडळात पवार गट १०–१२, शे. का. प. २–३, रिपब्लिकन २–३ व उरलेल्यात जनता पक्ष अशी विभागणी होईल. जनता पक्षाच्या वाट्याला ज्या जागा येतील त्यात जनसंघाचे ३–४ पेक्षा अधिक मंत्री होणार नाहीत. राजकारण करायती करण्याइतके सोपे नसते. त्यामुळेच शे. का. पक्षाला थोड्या अधिक जागा देण्यास विरोध करणाऱ्यांनी काँग्रेसलाच (फुटीर गट) महत्त्व मिळवून दिले आहे. शे. का. पक्षाबरोबर समझौता करून जे साधले जाणार होते तेच समझौत्याविरुद्ध भूमिका घेणारांनी गमावले हे आता तरी पूर्वाश्रमीच्या जनसंघाला समजले तरी खूप झाले !

### दादांचे गणित

हा झाला पूर्वेतिहास ! वास्तवता ही आहे की, पवार यांच्या नेतृत्वाखाली १८ जुलै १९७८ रोजी जनता, त्याचे मित्रपक्ष व पवार गटाचे संमिश्र सरकार सत्तेवर आले व त्या सरकारला १८२ आमदारांचा पाठिंबा आहे. विरोधी पक्षाकडे आता १०६ आमदार आहेत. जनता व त्यांच्या बाजूकडील सदतीस आमदार फुटतील असे वसंतराव पाटील म्हणतात. ते खरे मानले तरी त्यांच्याकडे १४३ आमदार होतील व दादांना बहुमत मिळणार नाही. दादा ३७ चा आकडा सांगतात. हा आकडा कसा आला ? राजारामबापू पाटील यांना मंत्रिमंडळात घेतले जाणार नाही. तीच अवस्था बाळासाहेब देसाई यांची आहे. हे दोघेही नाराज असून ते दादांशी बोलणी करीत आहेत अशी बोलबाला आहे. बापू–बाळासाहेब यांच्यामागे ३७ आमदार असते तर त्यांना दादांजवळ जाण्याचा प्रसंग आलाच नसता. राजारामबापू पाटील यांनी काही आमदारांची दिशाभूल करून काही महिन्यांमागे दुर्बल घटक सेवा संघ नावाची संघटना जनता पक्षांतर्गत स्थापन केली आहे. त्या बैठकीत जनता पक्षाचे ३० आमदार होते. दुर्बल घटकांच्या नावावर बापू-बाळासाहेब आपले राजकारण करू पाहत आहेत असे दिसताच यातील आमदार दुर्बल घटक सेवा संघाच्या बैठकीला हजर राहत नाहीत. त्यामुळे दादांना राजारामबापू व बाळासाहेब सदतीस आमदार मिळवून देऊ शकत नसल्याने पवार सरकार लौकरच पडेल हे दादांचे गणित चुकणारे आहे ! ! ❑


**तीन राजहंस प्रकाशने**

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू । चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू । सात रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट । सहा रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

**१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०**

# महाराष्ट्र

## जनता–काँग्रेस आघाडीचा प्रयोग

वा. दा. रानडे

महाराष्ट्रात काँग्रेसविरोधी पक्षांना सत्तेवर येण्यासाठी अखेर काँग्रेसमधल्याच एका गटाचा आधार घ्यावा लागला, ही गोष्ट जनता पक्षाच्या सामर्थ्याची मर्यादा दर्शविते. इंदिरा काँग्रेस सत्तेवरून दूर झाली हे चांगले झाले; पण त्यासाठी पवार गटाची मदत घेऊन त्यांना मुख्यमंत्रिपद देण्याची जबर किंमत जनता पक्षाने द्यावयाला हवी होती काय हा खरोखर विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हुकूमशाही प्रवृत्तीच्या इंदिरा काँग्रेस गटाला एकाकी पाडायचे, त्यासाठी इंदिराविरोधी सर्व गटांना एकत्र आणायचे या धोरणाचे पहिले पाऊल म्हणून महाराष्ट्रातील प्रयोगाकडे पाहिले जात आहे, पण प्रत्यक्षात हा उद्देश कितपत साध्य होणार आहे ? एक तर महाराष्ट्रातील प्रयोग महाराष्ट्रापुरताच मर्यादित आहे. सबंध देशात काँग्रेसबरोबर अशी आघाडी केली जाणार नाही असे जॉर्ज फर्नांडिस यांनी सांगितले. यावरून केंद्रीय नेत्यांचा याबाबत एक दृष्टिकोन नाही हे स्पष्ट आहे. तेव्हा फारशा ध्येयवादी, उदात्त दृष्टिकोनातून या प्रयोगाकडे न पाहता सत्ता मिळविण्यासाठी केलेली ही आघाडी आहे हीच वस्तुनिष्ठ भूमिका स्वीकारायला हवी.

जनता पक्षाने अशी आघाडी करून काही चांगला पायंडा पाडलेला नाही. निवडणुकांत दोन्ही काँग्रेस पक्ष सारखेच अशी भूमिका जनता नेत्यांनी मांडली होती. आता ती भूमिका बदलताना पक्षाने मतदारांना विश्वासात घ्यायला नको होते का ? त्यांचा एक प्रकारे हा विश्वासघातच आहे. हे लोक आज काँग्रेसला विरोध करीत असले तरी सत्तेवर येण्यासाठी उद्या त्यातल्या एका गटाशी आघाडी करणार आहेत हे मतदारांना आधी माहीत असते तर त्यांनी जनता उमेदवारांना एवढ्या मोठ्या संख्येने निवडून दिले असते का असा प्रश्न मनात येतो. निवडणूक-जाहीरनाम्यात मांडलेले धोरण काही असाधारण परिस्थिती उद्भवल्यासच बदलावे लागते हे मान्य, पण पवार गटाशी आघाडी करणे भागच पडावे अशी काय असाधारण परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली होती ? तसे काही घडलेले नाही. काही निश्चित कार्यक्रमाच्या पायावर ही आघाडी झाली काय ? तसेही दिसत नाही. जनता पक्षाची मंडळी सत्ता मिळविण्यास अधीर झाली होती. पवार गटाशी आघाडी केल्याशिवाय सरकार बनविणे शक्य नव्हते. मुख्यमंत्रिपदाची किंमत पदरात पडल्यावरच पवार सहकार्यास तयार झाले असे दिसते. सत्तारूढ पक्षातल्या किंवा आघाडीतल्या एखाद्या गटास फोडावयाचे आणि त्या गटाच्या नेत्यास मुख्यमंत्रिपद देऊ करून आपल्या आघाडीचे सरकार बनवावयाचे हे १९६७ चेच तंत्र या वेळी वापरण्यात आले. हे फोडाफोडीचे राजकारण खेळण्याबद्दल काँग्रेस-नेत्यांवर विरोधी पक्षनेत्यांनी आतापर्यंत कडक टीका केली होती, पण आता तोच डाव तेही खेळत आहेत.

हा डाव खेळण्याची काय आवश्यकता होती ? जनता पक्ष विरोधी पक्षच म्हणून राहिला असता तर काय बिघडले असते ? इंदिरा काँग्रेसचा पक्ष सत्तेपासून दूर झाल्याने आपले बळ वाढविण्यासाठी त्याला आता सरकारी यंत्रणेचा वापर करता येणार नाही. त्याचे बळ घटेल असा एक युक्तिवाद बोलला जात आहे, पण तो पटणारा नाही. सत्तेच्या उपयोगाने बळ वाढत असते तर मग १९७७ च्या निवडणुकात इंदिरा गांधींचा व काँग्रेसचा एवढा मोठा पराभव का झाला असता ? उलट महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला सत्तेवर राहू देण्यानेच ती लोकांच्या मनातून आणखी उतरली असती, आणीबाणीच्या अनुभवातून इंदिरा गांधींचा पक्ष काहीच धडा शिकलेला नाही. त्याचे काम पूर्वीच्या पद्धतीनेच चालू आहे. याचा अनुभव आल्याने जनता अधिकच इंदिरा काँग्रेसविरोधी बनली असती. दादांचा काँग्रेस पक्ष अगदीच निष्प्रभ आहे. इंदिरा काँग्रेसच्या प्रभावाखाली आणि तिच्या तंत्रानेच त्याला कारभार पहावा लागत आहे याचाही प्रत्यय जनतेस आला असता. दोन्ही काँग्रेस पक्षातील संघर्ष वाढत जाऊन आघाडी मोडली असती आणि सरकार गडगडले असते.

जनता व काँग्रेस यांच्या आघाडीचे सरकार स्थापल्याने महाराष्ट्राला एस्. एम्. जोशी म्हणतात त्याप्रमाणे स्थिर व लोकशाही सहकार मिळेल. दोन्ही पक्ष आपले बळ वाढविण्याचा प्रयत्न करतील; पण अधिक फायदा पवार गटाच्या काँग्रेसला मिळण्याचा संभव आहे. आघाडी बनविताना जनता पक्षाने घातलेल्या दोन अटी पवार गटालाच फायद्याच्या आहेत. पवार गट आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवील आणि काँग्रेसचे आमदार फोडण्याचा प्रयत्न होता कामा नये. या अटी जनता पक्षाने घातल्या म्हणण्यापेक्षा पवार गटाने घातल्या व जनताने त्या मान्य केल्या असे म्हणणे अधिक योग्य होईल. काँग्रेसचे आमदार फोडण्याचा प्रयत्न होता कामा नये ही एकतर्फी अट झाली. जनता पक्षाचे आमदार आम्ही फोडणार नाही अशी अट पवार गटाने मान्य करायला नको का ? पण तशी काही अट घातल्याचा उल्लेख एस्. एम्. जोशींनी केलेला नाही. प्रत्यक्षात याचा अर्थ असा होतो की काँग्रेसचे आमदार जनता पक्षाने फोडता कामा नयेत; पण जनता पक्षाचे आमदार फोडण्याची पवार गटाला मात्र मोकळीक आहे. एस्. एम्. जोशींच्या भाषणाचा वृत्तांत चुकीचा आलेला असेल. त्यांना असे काही अभिप्रेत नसेलही; पण प्रत्यक्षात त्यातून तसा अर्थ निघतो. वास्तविक आघाडी करणाऱ्या पक्षांपैकी कोणीही दुसऱ्या पक्षाचे आमदार फोडावयाचे नाहीत ही अट सर्वांवरच बंधनकारक हवी. तशी ती घातली जाईल अशी अपेक्षा आहे. निश्चित अटी व कार्यक्रमाच्या पायावर आघाड्या उभारल्या नाहीत तर फोडाफोडीच्या कारवाया सुरू होऊन आघाड्या भंगतात असा अनुभव अनेक आघाड्यांबाबत आतापर्यंत आलेला आहे. काही वर्षांपूर्वी ओरिसामध्ये काँग्रेसने गणतंत्र परिषदेशी आघाडी करून संयुक्त मंत्रिमंडळ स्थापले होते. पुढे परिषदेचे एकेक सभासद त्यांनी आपल्या पक्षात आणले आणि एकट्याच्या बळावर सरकार बनविण्याइतके आपले बळ वाढले आहे अशी खात्री झाल्यावर आघाडी मोडून टाकली. केरळमध्ये कम्युनिस्टांच्या हाती सत्ता जाऊ नये म्हणून काँग्रेस व प्रजासमाजवाद्यांनी १९५४ च्या निवडणुकांनंतर आघाडी केली. मंत्रिमंडळ प्रजासमाजवाद्यांचे व काँग्रेसचा बाहेरून पाठिंबा अशी व्यवस्था ठरली; पण पुढे फोडाफोडी करून काँग्रेसने आपले बळ वाढविले आणि प्रजासमाजवाद्यांच्या पाठिंब्याची गरज नाही असे दिसताच आपला पाठिंबा काढून घेऊन मंत्रिमंडळ पाडले.

जनता–काँग्रेस आघाडीच्या बाबतीत असे काही घडेलच असे नाही; पण आघाडी मोडू नये यासाठी काही संकेत सर्व घटकपक्षांनी ठरवून ते पाळायलाच हवेत. आघाड्यांचे सरकार नेहमीच अयशस्वी होते असे मानण्याचेही कारण नाही. केरळमध्ये काँग्रेस–कम्युनिस्ट आघाडीचे सरकार यापूर्वीच्या इतर कोणत्याही सरकारपेक्षा अधिक काळ टिकले. आघाडीने आठ वर्षे राज्याला स्थिर राजवट दिली. येथे त्या राजवटीच्या धोरणाची प्रशस्ती करावयाची नाही; पण स्वतःच्या पक्षापुरता विचार सोडून निश्चित धोरण, कार्यक्रम व कार्यपद्धतीला बांधून घेतले तर जनता व काँग्रेस आघाडीचे सरकारही महाराष्ट्राला चांगले शासन देऊ शकेल; पण आपल्या अपेक्षा पुऱ्या होत नाहीत असे दिसले तर आघाडी मोडण्याची तयारी जनता पक्षाने ठेवायला हवी.

□

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरन्दरे

# क्रेमलिनच्या बुरजावर मानवतेची लक्तरे

मूलभूत मानवी हक्क आणि स्वातंत्र्य यांची पायमल्ली रशियात मोठ्या प्रमाणावर आणि क्रूरपणे होते हे आता उघड गुपित झालेले आहे. पश्चिमेकडील राष्ट्रांना सध्या मानवतावादाचा पुळका आल्याने रशियातील स्वातंत्र्यवादी बुद्धिवंत पश्चिमेचा आश्रय घेऊन राजवटीवर हल्ला चढवीत असतात. मध्यंतरी पाश्चिमात्य देशांच्या दडपणाने रशियन राजवटीचे धोरण या बाबतीत जरा सैल झाल्यासारखे वाटले होते, परंतु नुकत्याच झालेल्या रशियान्तर्गत विरोधकांच्या खटल्यावरून तो भ्रमनिरास झालेला आहे.

अलेक्झांडर जिन्झबर्ग, विक्टोरस पेट्कस आणि अॅनाटोली शरान्स्की हे ते प्रमुख तीन विरोधक होत.

या तिघांपैकी अॅनाटोली शरान्स्की याच्यावरचा खटला सध्या पाश्चिमात्य जगात गाजत आहे. स्टॅलिनच्या राजवटीनंतर इतक्या गंभीर स्वरूपाची आणि माणुसकीला लाजिरवाणी अशी ही पहिलीच ट्रायल होती. शरान्स्कीवर पुढील आरोप ठेवण्यात आले होते. १) देशद्रोह २) सोव्हिएट रशियाची प्रतिष्ठा आंतर राष्ट्रीय क्षेत्रात खराब करणे ३) रशियाविरोधी साहित्याचा प्रचार करणे. यातील देशद्रोहाचा आरोप अर्थातच सगळ्यात गंभीर होता. त्यामुळे त्याला मृत्युदंडापर्यंत कोणतीही शिक्षा होणे शक्य होते. सरकारच्या म्हणण्याप्रमाणे १९७५-१९७७ च्या दरम्यान शरान्स्कीने परदेशी वार्ताहरांशी संबंध ठेवले आणि अत्यंत गुप्त लष्करी योजना त्यांना कळविल्या. रॉबर्ट टोथ हा 'लॉस एंजेलस टाइम्स'चा वार्ताहर मॉस्कोत गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यापर्यंत होता. हा शरान्स्कीचा दोस्त होता. तो अमेरिकेच्या लष्करी हेरखात्यासाठी काम करीत होता असा रशियाचा आरोप आहे. त्याला शरान्स्कीने अनेक गुपिते कळविली व त्याच्यामार्फत ती CIA ला कळविली असा अत्यंत गंभीर आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला. याशिवाय व्हाइस ऑफ अमेरिका, रेडिओ ऑफ फ्री युरप आणि बीबीसी यांनी प्रसिद्ध केलेला रशियाविरोधी मजकूर रशियात प्रसृत केला व राजवटीविरुद्धच्या कारवायांना मदत केली असे आरोप ठेवले होते.

सी. आय. ए. शी संबंध होता असा आरोप ठेवल्याने शरान्स्कीला एकदम आंतर राष्ट्रीय वजन प्राप्त झाले. अमेरिकेचा हस्तक असे अप्रत्यक्षपणे अनेक विरोधकांना म्हणण्यात आले होते, पण इतक्या उघडपणे प्रथमच हा आरोप ठेवण्यात आला. अमेरिकेच्या अध्यक्षाने तातडतोब एका चौकशीचा आदेश दिला आणि त्या चौकशीमंडळाचा निर्णय स्वत: पत्रकारपरिषदेत जाहीर केला. त्यान्वये शरान्स्कीचा कधीही कोणत्याही स्वरूपात सी. आय. ए. शी संबंध नव्हता आणि नाही. जिमी कार्टरने स्वतः एवढी जबाबदारी उचलून स्वतःची प्रतिष्ठा पणाला लावली होती. त्यामुळे शरान्स्कीचा खटला पुढे तरी ढकलला जाईल किंवा शिक्षेत सूट तरी मिळेल अशी अपेक्षा होती, परंतु पश्चिमेला धक्का देण्यासाठीच हे षड्यंत्र रचण्यात आले होते. रशियाने खटला चालविण्याचा निर्णय कायम ठेवला.

अॅनाटोली शरान्स्की हा तीस वर्षांचा कॉम्प्युटर इंजिनिअर आहे. त्याचे इंग्रजीवर प्रभुत्व असल्याने त्याचे मॉस्कोतल्या अनेक परदेशी वार्ताहरांशी मैत्रीचे संबंध होते. त्याचप्रमाणे रशियाच्या वैज्ञानिकांच्या उच्चवर्तुळात तो असल्याने जागतिक दर्जाच्या वैज्ञानिकांशीही त्याचे संबंध होते. तो जन्माने ज्यू आहे. पाच वर्षांपूर्वी रशिया सोडून इस्राएलला जाण्यासाठी त्याने अर्ज केलेला होता, परंतु त्याला परवानगी नाकारण्यात आली. (ज्यू रशियन मोठ्या प्रमाणात देशत्याग करू इच्छितात.) त्याची पत्नी नाताला ही एकदीड वर्षापूर्वीच रशिया सोडून गेली होती. या ज्यूंच्या देश सोडण्याच्या मोहिमेत त्याने मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. रशियात असणारा, अजूनही मुक्त असणारा आणि राजवटीविरुद्ध आवाज उठविणारा आंद्रे साखारोव याच्याशी संबंध असण्याचा आरोप ठेवण्यात येऊन शरान्स्कीला गत वर्षीच्या मार्चमध्ये अटक करण्यात आली. दीड वर्ष तो अंधारकोठडीत एकटा होता. सर्व प्रकारच्या मनाचा तोल ढळवणाऱ्या प्रयोगांतूनही तो खंबीरपणे डोके शाबूत ठेवण्यात यशस्वी ठरला.

मॉस्कोमध्ये 'पीपल्स कोर्ट' मध्ये शरान्स्कीवर रचलेल्या आणि निकाल आधीच माहीत असलेल्या खटल्याची सुरुवात १२ जुलैला झाली. एकूण पाच दिवस हे नाटक चालले. या खटल्याच्या कामकाजापासून पाश्चिमात्य वार्ताहर आणि शरान्स्कीची आई यांना दूर ठेवण्यात आले होते. फक्त त्याचा भाऊ लिओनिद याला कोर्टात यायची परवानगी देण्यात आली होती.

भाडोत्री श्रोते या कार्यक्रमासाठी जमवण्यात आले होते. शरान्स्कीच्या बाजूने साक्ष देणारे जवळजवळ कोणीच नव्हते. कोर्ट विरुद्ध बाजूच्या साक्षीदारांनी ठेस भरले होते. शरान्स्कीने सरकारनियुक्त वकील फेटाळून लावला आणि सगळे आरोप बिनबुडाचे आणि खोटे असल्याचे सांगितले. त्याचे शेवटचे भाषण फारच सुंदर होते. लिओनिद शरान्स्कीने ते पाश्चिमात्य वार्ताहरांना दिले. अॅनाटोली शरान्स्कीने त्याला राजवटीने दाखविलेल्या आमिषांचे वर्णन करून सांगितले. फाशी किंवा १५ वर्षांची सक्तमजुरी (ही रशियातली सगळ्यात कठोर शिक्षा) ही शिक्षा तुला होऊ शकेल असे त्याला सांगण्यात आले होते. मात्र, जर ज्यूंच्या देशत्यागाच्या चळवळीचा कणा मोडायला राजवटीला मदत केली, तर त्याला मुक्त करण्यात येईल, इतकेच नव्हे, तर पत्नीलाही भेटू दिले जाईल असे वचन दिले; 'पण मी तरीही त्यांना दाद दिली नाही आणि मी सामान्य माण-

साला मदत केली याचा मला अभिमान वाटतो. पाच वर्षांपूर्वी जेरुसलेमला जाण्याचे माझे स्वप्न अजून अभंग आहे. प्रत्येक सच्चा ज्यू म्हणतो त्याप्रमाणे 'पुढचे वर्ष जेरुसलेमला' हे मी आजही म्हणेन !'

शरान्स्कीला १३ वर्षांची शिक्षा झाली. त्यातील १० वर्षे त्याला रशियाच्या कुप्रसिद्ध लेबर कॅम्प्समध्ये काढायची आहेत. या लेबर कॅम्प्समध्ये भयानक परिस्थिती असते. प्रमुख गोष्ट म्हणजे अत्यंत अपुरा आहार देण्यात येतो आणि काम मात्र फारच करून घेण्यात येते. ३ वर्षे त्याला साध्या तुरुंगात काढायची आहेत. १५ वर्षे ही रशियन तुरुंगातील जास्तीत जास्त शिक्षा आहे. त्याहून दोन वर्षे शरान्स्कीला कमी देण्यात आलेली आहेत. त्याचे वय ( ३० ) आणि दोन मुले, तसेच गुन्ह्याची पहिलीच वेळ लक्षात घेऊन हे करण्यात आले असे निकालात म्हटले आहे. निकाल जेव्हा जाहीर झाला, त्या वेळी भाडोत्री श्रोते 'फारच कमी शिक्षा दिली आहे !' असे मोठमोठ्यांदा ओरडले. मॉस्कोपासून दीडशे मैलांवर असणाऱ्या अत्यंत कुप्रसिद्ध वलादिमीर तुरुंगात त्याला न्यायच्या आधी कोर्टात हजर असणारा लिओनिद शरान्स्की हा त्याचा भाऊ 'सगळे जग तुझ्या पाठीशी आहे' असे ओरडला. जेव्हा हा लिओनिद ही घटना आणि साऱ्या निकालाचा वृत्तान्त पाश्चिमात्य पत्रकारांना सांगत होता, तेव्हा KGB या रशियन गुप्तहेरसंघटनेतर्फे सगळ्या प्रसंगाची फिल्म घेण्यात येत होती. सर्व पाश्चिमात्य वार्ताहर त्यात घेतले गेले. एका ब्रिटिश वार्ताहराला आपल्या मोटरचे टायर्सही नंतर फोडलेले आढळले.

अशाच प्रकारच्या खटल्यातला दुसरा आरोपी अलेक्झांडर जिन्झबर्ग होता. त्याचा खटला मॉस्कोपासून १०० मैलांवर कलुगा या ठिकाणी चालविला गेला. तो ४ दिवस चालला आणि अपुरा आहार असलेल्या मजूरवसाहतीत ८ वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा त्याला देण्यात आली. हा जिन्झबर्ग अलेक्झांडर सोल्झेनित्सिनचा एक निकटवर्ती होता. त्याच्या खटल्यात त्याच्या बाजूने साक्ष देण्याची इच्छा आन्द्रे साखारीवने व्यक्त केली होती आणि कोर्टाच्या कामकाजात जरी त्याचे नाव आले तरी त्याला साक्ष देऊ दिली नाही. जिन्झबर्गनेही सरकारी वकील नाकारला. त्याच्यावर सोल्झेनित्सिनच्या व गुलागआर्चिपिलॅगोचा प्रचार केल्याचा आरोप होता.

रशियातील राजकीय कैद्यांच्या नातेवाइकांच्या मदतीसाठी सोल्झेनित्सिन फंड नावाचा एक फंड गोळा करण्यात येतो. हा फंड सरकारला अर्थातच मंजूर नाही. जिन्झबर्ग याचा एक प्रमुख कार्यकर्ता असल्याने त्याच्यावर विदेशी पैसा वापरल्याचाही आरोप ठेवण्यात आला. जिन्झबर्गची आरोपी म्हणून उभे रहाण्याची ही दुसरी वेळ आहे. त्याला राष्ट्रीयत्व कोणते असा प्रश्न कोर्टाने विचारल्यावर त्याने 'कैदी' असे उत्तर दिले !

एक्केचाळीस वर्षांचा जिन्झबर्गही दीड वर्ष तुरुंगात बिकट परिस्थितीत होता. त्याची बायको अरिना जिन्झबर्ग हिने त्याच्या खटल्याच्या दुसऱ्याच दिवशी एका साक्षीदाराला खोटारडा म्हटले म्हणून तिला हाकलण्यात आले. जिन्झबर्गच्या आईला मात्र आत सोडण्यात आले होते.

तिसरा गुन्हेगार विक्टोरस पेट्कस होता. याला मात्र पूर्ण १५ वर्षांची अमानुष शिक्षा मिळाली. हा लिथुआनिअन आहे. तो कॅथॉलिक असून मानवी हक्क संभाळण्याची दक्षता घेणाऱ्या हेलसिंकी गटाचा सभासद असल्याने तो राजवटीच्या डोळ्यांत खुपणे स्वाभाविक होते. त्याच्यावरही गुलाग आर्चिपिलॅगोच्या प्रचाराचा आरोप ठेवण्यात येऊन त्याला अडकविण्यात आले. त्याचे वय ४९ आहे.

### प्रतिक्रिया

या सर्व कारस्थानांवर अतिशय कडवट प्रतिक्रिया व्यक्त होणे स्वाभाविक होते. जिमी कार्टरने संपूर्ण जगाच्या सदसद्विवेकबुद्धीला धक्का बसला आहे आणि आमची पूर्ण सहानुभूती कैद्यांबरोबर आहे असे जाहीर केले. इंग्लंडचा पंतप्रधान जेम्स कॅलॅघन याने आतापर्यंतच्या सर्व घटनांहून गंभीर अशी ब्रिटन–रशिया संबंधावर परिणाम करणारी ही घटना आहे असे मत व्यक्त केले. लोकशाहीवादी राष्ट्रप्रमुखांच्या, ज्यांना रशिया नाही तरी 'बूर्ज्वा'च म्हणतो, त्यांच्या प्रतिक्रिया अशा येणे स्वाभाविकच होते; परंतु रशियन कम्युनिस्ट पक्षाचा सगळ्यात जवळचा पश्चिमी कम्युनिस्ट पक्ष म्हणजे फ्रेंच कम्युनिस्ट पक्ष. त्यानेही कडवट प्रतिक्रिया व्यक्त केली आणि सर्व विरोधकांना स्वातंत्र्य देण्याची मागणी केली. स्वित्झर्लंडने यांना राजकीय आश्रय देण्याची तयारी दर्शविली. ब्रिटनने रशियाचा कोळसाखात्याचा मंत्री बोरिस ब्राचेन्को यांची ब्रिटनभेट रद्द करून निषेध दर्शविला, तर अमेरिकेने काही निम्नस्तरीय रशिया-अमेरिका कार्यक्रम रद्द केले.

### परिणाम

१) स्ट्रॅटेजिक आर्म्स लिमिटेशन ट्रीटी ( SALT ) ची बैठक सुरू होणार असतानाच रशियाने हा निर्णय घेतला. ही बैठक अमेरिकेचा परराष्ट्रखात्याचा सेक्रेटरी सायरस व्हान्स आणि रशियाचा परराष्ट्रव्यवहारमंत्री आन्द्रे ग्रोमिको यांच्यात होणार होती, ती सुरूही झाली. यावरून अमेरिका–रशिया संबंधांवर गंभीर परिणाम होणार हे ग्रहीत धरूनही किंवा त्या गांभीर्याचा पूर्ण अंदाज घेऊनही रशिया कोणत्याही स्वरूपात अंतर्गत स्वातंत्र्य देऊ इच्छित नाही हे ठामपणे दर्शविण्यासाठीच हा प्रकार घडवून आणला असावा. अमेरिका रशियाचे कणभरही वाकडे करू शकत नाही आणि अमेरिकेचा अध्यक्षसुद्धा एकाही विरोधकाला क्रेमलिनच्या वरवंडट्यापासून वाचवू शकत नाही हे उघड


## वेळ निघून जात आहे !

❊ आपले कर विवरण पत्रक दाखल करण्याची घाई करा.

❊ विवरण पत्रक दाखल करण्यापूर्वी स्वयंआकारणी कर-भरण्याची आठवण ठेवा.

निवेदक.
डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन
(रिसर्च, स्टॅटिस्टिक्स अँड पब्लिकेशन)
इन्कम टॅक्स डिपार्टमेंट
नवी दिल्ली – ११०००१

DAVP 78 / 128

झाले. त्यामुळे अमेरिकेत अलीकडच्या काळातील तीव्र अशी रशियाविरोधी लाट उसळली आहे. माल्कम टून या अमेरिकेच्या रशियातील राजदूताने SALT ची बैठक रद्द करण्याची विनंती व्हान्सला या दरम्यान केली; पण बैठक सुरू झाली.

२) पश्चिमेच्या राष्ट्रांवर विज्ञान-भांडवल या दृष्टीने रशिया मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे; परंतु ही राष्ट्रेही जागच्या जागी थोडीफार शेपटी आपटतील आणि मग गप्प बसतील हा रशियाचा अंदाज आजपर्यंतच्या या राष्ट्रांच्या प्रतिक्रिया पहाता खरा ठरायला हरकत नाही. पश्चिमेची प्रेस जरासा आरडाओरडा करील; परंतु प्रेसकडे लक्ष देण्याचे काहीच कारण नाही असे गणित बांधूनच रशियाने हा निर्णय घेतला असावा.

३) निर्णय १५ जुलैला जाहीर झाल्यापासून काही तासांतच प. जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, इटली, जपान, अमेरिका आणि कॅनडा या सात अतिसंपन्न राष्ट्रांच्या प्रमुखांची बैठक बॉनमध्ये सुरू झाली. त्या शिखर-परिषदेत काही प्रतिसाद उमटेल अशी अपेक्षा आहे. रशियानेही हे त्यांना सरळसरळ आव्हानच दिल्यासारखे आहे.

४) रशियातील अंतर्गत सत्तास्पर्धेत जहाल गट तात्पुरता तरी जिंकलेला दिसतो. कारण हेलसिंकी कराराच्या नावाखाली रशियातले विरोधक अवाजवी माजले आहेत आणि त्यांना वठणीवर आणलेच पाहिजे, मग पश्चिमेच्या राष्ट्रांचे काहीही मत होवो अगर जगात कितीही बदनामी होवो अशा विचारसरणीचा KGB चे नियंत्रण करणारा गट आहे. याचा नेता मायकेल सुस्लोव. त्याने सरळ ब्रझनेवच्याच प्रथम क्रमांकाला आव्हान दिले आहे. ब्रझनेवची ढासळती प्रकृती पहाता रशियातील राजकीय अस्थिरता चटकन् ध्यानात येते.

५) इतक्या क्रूर पद्धतीने जरी चळवळ दडपण्याचा रशियाने प्रयत्न केला तरी ती दडपली जाण्याएवजी अधिक फोफावेल असेच दिसते; पण राजवटीचा अट्टाहास चालूच आहे. धमकी देणारा मात्र याचबरोबर चिली आणि इराणला कार्टर क्रेमलिनच्या बाबतीत किती दुबळा ठरतो आणि मानवी हक्कांच्या नावाने बोंबलणारी पश्चिमी राष्ट्रे आयत्या वेळी कशी शेपूट घालतात हे उघडे सत्य अधिकच स्पष्ट झाले. □

कथा

# प्रसिद्धीची हौस

: मूळ लेखक :
बोरिस लास्किन

: अनुवाद :
दे. य. ठोकळ

माझ्या काही मित्रांचा तुम्हाला परिचय करून देतो. माझ्या मित्रांचा परिचय करून देण्याचे कारण असे की, या माझ्या मित्रांच्यापैकी एकाची मनोरंजक गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे.

मिखाइल स्तेपानोव, सर्गेईकारेत्निकोव, लियुदमिला फोमिना, ही माझी जिवलग मित्रमंडळी. यातील लियुदमिला फोमिना ही मुलगी आहे. बालपणापासून आम्ही एकत्र खेळलो. एकाच शाळेत शिकलो. एकत्र बसून बीजगणिताचा काथ्याकूट केला. सर्वांनी एकाच वेळी शाळेची परीक्षा दिली. परीक्षेत सर्वजण पास झालो. ज्याच्याविषयी मी गोष्ट सांगणार आहे, तो मित्र म्हणजे मिखाइल स्तेपानोव. एकदा काय झालं, हा मिखाइल एका पोरीच्या प्रेमात पडला; परंतु त्याचं प्रेम असफल झालं. प्रेमभंग झाल्यामुळं तो दुःखी झाला आणि या प्रेमभंगाच्या घटनेमुळं त्यानं सर्व मानवांची दोन गटामध्ये विभागणी करून टाकली. त्याच्या मते काही लोक भाग्यवान असतात आणि काही अभागी असतात. मिखाइलचा समावेश दुसऱ्या गटात होत होता. त्याला कोणत्याच गोष्टीत यश मिळत नव्हतं.

त्याचा प्रेमभंग झाला ही गोष्ट महत्त्वाची नाही, तर मिखाइलचं खरं दुःख होतं प्रसिद्धी मिळविण्याचं. त्याला आतापर्यंत कशातच प्रसिद्धी मिळत नव्हती. आपणाला खूप प्रसिद्धी मिळावी अशी त्याची तीव्र इच्छा होती.

आमच्या तिघांच्यामध्ये फक्त त्यालाच प्रसिद्धी मिळाली नव्हती. कारण आम्हा सर्वांना वेगवेगळ्या क्षेत्रांत प्रसिद्धी मिळाली होती; परंतु मिखाइल आज बरीच वर्षं प्रसिद्धीची स्वप्नं बघत होता. पण त्याला प्रसिद्धी मिळत नव्हती. त्याला सारखं वाटत होतं की, सगळीकडे आपली प्रसिद्धी व्हावी. प्रसिद्धीचा तुरा आपल्या मुकुटात खोचला जावा.

आमच्यापैकी सर्गेइकारेत्निकोवला शेतीच्या क्षेत्रात प्रसिद्धी मिळाली होती. एका दूरच्या प्रदेशात तो गेला होता. त्या प्रदेशातील जमिनीला नांगराचा स्पर्श सुद्धा झाला नव्हता. त्यानं ती शेती नांगरली. अतिशय चांगल्या पद्धतीनं काम केलं. या कामामुळं त्याचं नाव सबंध देशात पसरलं. वर्तमानपत्रांत त्याचे फोटो छापून आले. तो मॉस्कोला परत आला तेव्हा जॉर्ज हॉलमध्ये होणाऱ्या नृत्याच्या कार्यक्रमासाठी त्याला निमंत्रण देण्यात आलं. तिथं त्यानं एका सुंदर मुलीबरोबर नृत्य केलं. त्या नृत्याच्या कार्यक्रमाला तुफान गर्दी झाली होती. प्रत्येकानं त्याचं अभिनंदन केलं.

लियुदमिला फोमिनाला सुद्धा प्रसिद्धी मिळाली. ती विश्वविद्यालयात दाखल झाली होती. विश्वविद्यालयाच्या नाटकमंडळानं चेखव या नाटककाराचं 'तीन बहिणी' हे नाटक सादर केलं. तिनं या नाटकात इरिनाची भूमिका केली. तिनं ही भूमिका खूपच छान वठविली. या भूमिकेमुळं तिचे प्राध्यापक खूष झाले. दुसऱ्या दिवशी रसायनशास्त्राची परीक्षा होती. त्या वेळी प्राध्यपकांनी तिच्या पेपरवर 'फारच छान' असा शेरा दिला. सहा महिन्यांनंतर लियुदमिलानं ज्यूलियटची भूमिका केली. ती भूमिका सुद्धा गाजली. ओघानंच तिला प्रसिद्धी मिळाली.

परंतु मिखाइल? त्याला प्रसिद्धी मिळत नव्हती. तो प्रसिद्धीचा भुकेला होता. त्याला

सारखं वाटत होतं की, एका रात्रीत आपणाला प्रसिद्धी मिळावी. त्याच्या अशा बोलण्यावर आम्ही त्याची टिंगल करीत असू. तेव्हा तो म्हणत असे–' मित्रांनो, थोडं थांबा. एक दिवस असा येईल की मला प्रसिद्धी मिळालेली तुम्ही बघाल !'

आणि खरोखर एक दिवस त्याच्या विषयी जाहीरपणे ऐकायला मिळालं. त्याचं असं झालं.

रविवारचा दिवस होता. संध्याकाळची वेळ होती. काही कामानिमित्तानं मिखाइल ट्रामनं प्रवास करीत होता. ट्राममध्ये बसल्या बसल्या तो दिवास्वप्न बघत होता. मनातल्या मनात कल्पनांची उतरंड रचीत होता. त्यानं डोळे मिटून घेतले आणि कल्पनांच्या घोड्यांचे लगाम आणखी सैल सोडले. त्यानं कल्पना केली की, आपण फार मोठी बहादुरी केली आहे. आपलं कौतुक करण्यासाठी प्रचंड गर्दी झाली आहे. लोकांनी फुलांच्या हारांचा वर्षाव केला आहे. आपणाला खांद्यावर घेऊन लोक नाचत आहेत. अशी गोड कल्पना करीत असताना त्यानं डोळे उघडले. डोळे उघडताच त्याला एक दृश्य दिसले. ते दृश्य बघून तो भानावर आला. दिवास्वप्नातून पूर्णपणे जागा झाला. रस्त्याच्या कडेला प्रचंड गर्दी जमली होती. लोक एका उंच इमारतीकडे बघत होते. वरच्या मजल्यावर आग लागली होती. खिडकीतून धुराचे लोट बाहेर येत होते. खिडक्यांवर रबरी पाइपातून पाण्याचा मारा चालू होता. हे दृश्य बघून मिखाइलने चालत्या ट्राममधून खाली उडी घेतली आणि त्या आग लागलेल्या इमारतीकडे धावला. गर्दीतून वाट काढीत इमारतीच्या मागच्या बाजूकडे गेला. सांडपाण्याच्या नळाला धरून भरभर वर चढू लागला. एखाद्या डोंबाऱ्यासारखी स्फूर्ती त्याच्या अंगात संचारली होती. दोन मजले चढून गेल्यावर मिखाइलने खाली बघितले. सगळा जनसमुदाय उत्सुकतेनं त्याच्याकडे बघत होता. आता आपल्याला निश्चित प्रसिद्धी मिळणार असे त्याला वाटू लागले. मिखाइल आणखी वर चढला. आग लागलेल्या चौथ्या मजल्यावर आला. एका खिडकीतून त्यानं आत उडी घेतली. खोली धुरानं भरून गेली होती. स्पष्टपणे काहीच दिसत नव्हतं. खोलीत काही लोकांची अंधुकशी हालचाल जाणवत होती. एका कोपऱ्यात एक मनुष्य काही तरी ओरडून हातपाय हलविताना अंधुकसा दिसत होता. क्षणाचाही विलंब न करता मिखाइल त्याच्या जवळ गेला. बोलण्यात मुळीच वेळ न घालवता मिखाइलने त्या मनुष्याला आपल्या खांद्यावर उचलून घेतलं. धुराच्या लोटातून अडखळत, धडपडत तो खिडकीकडे धावला. खिडकीजवळ एक मोठा पडदा होता. त्यानं तो झटकन ओढला. खांद्यावरच्या मनुष्याला त्या पडद्यात गुंडाळलं आणि पाठीशी घट्ट बांधून घेतलं. आगीच्या ज्वाळा खिडकीपर्यंत आल्या होत्या. धुराच्या लोटामुळं गुदमरल्यासारखं होऊ लागलं. मिखाइल कसाबसा खिडकीत चढला. पाठीशी बांधलेल्या माणसाचे ओझे सांभाळीत पाइपाला धरून तो उतरू लागला. त्यानं एकदा खाली बघितलं. प्रचंड जनसमुदाय श्वास रोखून त्याच्याकडे बघत होता. पाठीशी बांधलेला मनुष्य हातपाय झाडून काही तरी बोलण्याचा प्रयत्न करीत होता. तो मनुष्य अतिशय घाबरलेला होता. तो ओरडत होता, परंतु जाड पडद्यामुळे त्याचा आवाज स्पष्टपणे ऐकू येत नव्हता. मिखाइलला दम लागला होता. धापा टाकीत तो त्या मनुष्याला म्हणाला,

' घाबरू नकोस बाबा, मी तुला वाचवतो आहे. जरासुद्धा हालचाल करू नकोस, नाही तर आपण दोघेही खाली कोसळू.'

मिखाइल असं म्हणाला तरी सुद्धा पडद्यात गुंडाळलेला तो मनुष्य ओरडतच होता. मिखाइल त्याची समजूत घालू लागला– ' अरे बाबा, ओरडू नकोस, तुझे आणखी कोणी नातेवाईक वरती अडकले असतील तर त्या सर्वांची सुटका करीन. तू काही एक काळजी करू नको.'

तो मनुष्य मोठ्यांदा ओरडून म्हणाला–

' तू मला कुठे घेऊन निघाला आहेस ?'

मिखाइल त्राग्यानं म्हणाला–

' अरे बाबा गप्प बस. आता फारच थोडं अंतर राहिलं आहे. आणखी चार-सहा पावलं खाली गेलं की, तू सुरक्षित उतरशील.'

थोड्याच वेळात मिखाइल खाली उतरला. पाठीवरचं ओझं घेऊन गर्दीकडे चालू लागला. इतक्यात वर्तमानपत्राचा एक फोटोग्राफर कॅमेरा सरसावून त्याच्या समोर आला. ज्या गोष्टीची इतके दिवस तो आतुरतेनं वाट बघत होता ती घडून आली होती. कॅमेऱ्याचा टिक् आवाज झाला. मिखाइलला अतिशय आनंद झाला. नकळत तो पुटपुटला–

' मिळाली एकदाची प्रसिद्धी.'

आनंदाच्या भरात त्यानं पाठीवरचं ओझं अलगद खाली ठेवलं. पडद्याची गाठ सोडून त्या व्यक्तीला बाहेर काढलं आणि...... मिखाइलला भोवळ आली.

त्याच्या समोर अग्निशामक दलातील कर्मचारी उभा होता. रागानं त्या कर्मचाऱ्याचा चेहरा लालबुंद झाला होता. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

पुस्तके

# ‘ओळी’तून विखुरलेली कविता

प्रदीप गोखले यांचा ‘ओळी’ हा कवितासंग्रह वाचताना दोन गोष्टी एकाच वेळी स्पष्ट होत जातात. एक, त्यांच्या कवितांपर्यंत वाचक पूर्णपणे पोहोचू शकत नाही आणि दुसरे म्हणजे, त्यांच्या सर्वच कविता वाचकाच्या मनाचा कब्जा घेऊ शकत नाहीत. अशा तऱ्हेने कवी आणि वाचक यांच्यामध्ये दोन्ही बाजूंनी अंतर उत्पन्न झालेले असले तरी एवढ्या अंतरावरूनही कविता बऱ्याचशा नीटपणे न्याहाळता येतील अशा विश्वासाने ही प्रतिक्रिया लिहिण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहे.

‘ओळी’कडे वळण्यापूर्वी ज्या गोष्टींकडे वाचकाचे लक्ष विशेषकरून वेधले जाते त्या दोन गोष्टी म्हणजे डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांची या संग्रहास जोडलेली प्रस्तावना आणि खुद्द कवीचे मोजक्या शब्दांत व्यक्त झालेले मनोगत. डॉ. बारलिंगे यांनी गोखल्यांच्या ‘ओळी’ का आवडतात, याची मीमांसा आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि आग्रही सिद्धान्तप्रतिपादनातून केलेली आहे. ‘बौद्धिक चमत्कृतींची पेरणी केलेली असणे’ हे त्यांच्या मते काव्यत्वाचे गमक आहे. मी व्यक्तिशः या मताशी सहमत नाही. गोखल्यांच्या कित्येक कविता बौद्धिक चमत्कारांनी युक्त असूनही मला कविता वाटत नाहीत; तर उलट असे चमत्कार विशेष करून नसलेल्या काही कविता खरोखरच सुंदर वठलेल्या आहेत, असे वाटते. या संदर्भातील उदाहरणे पुढे येतीलच; पण एवढे निश्चित म्हणता येईल की, डॉ. बारलिंगे यांनी गोखल्यांच्या कवितेतील एका ठळक वैशिष्ट्यावर नेमके बोट ठेवले आहे. विरोधलयीतून येणाऱ्या बौद्धिक चमत्कृतींमध्ये गोखल्यांच्या कवितेचे काव्यत्व नसले तरी बलस्थान नक्कीच दडलेले आहे, यात मला शंका वाटत नाही.

डॉ. बारलिंगे यांनी काव्याच्या महानतेसंबंधी सुचविलेला मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. त्यांच्या मते काव्याची व्यापकता–अनुभवकणांतून जगाचे रूप परिवर्तित करण्याची शक्ति–हाच काव्याच्या महानतेचा निकष होय. या दृष्टीने ‘उराशी वैविध्य जपणारी’ गोखल्यांची कविता व्यापक आहे असा दावा नक्कीच करता येईल. सुमारे साठ–पासष्ट कवितांमध्ये आशय, अभिव्यक्ति, भावनानुभव व शब्दकळा या सर्वच दृष्टींनी विविधता सर्वदूर पसरलेली आहे. आत्माविष्कारापासून उद्देशिकांपर्यंत, मुक्तछंदापासून अभंगरचनेपर्यंत, गर्द निराशेपासून आत्मसुखापर्यंत विविधतेची अनेक परिमाणे स्पर्शिली गेली आहेत. याबाबत थोडे तपशिलात जाणे योग्य होईल. ‘प्रेम’ व ‘मृत्यू’ या दोन सनातन विषयांवर मुख्यतः कवितालेखन झालेले आहे. तथापि कवीची आपल्या कवितालेखनाविषयीची प्रकटने विशेष मानावी लागतील.

‘मला त्यापेक्षा काही वेगळेच सांगायचे आहे.’

‘इतरांपेक्षा मी वेगळे काय सांगणार?’

‘मी आहे तसाच अभिव्यक्त होऊ शकत नाही काय?’

कपाळावरील घाम निथळून टाकावा.

तसे मी मनोविश्वाला शब्दातून मोकळे करतो.’

अशा ओळींमधून गोखले कवितालेखनाबद्दल जसे कॉन्शस झालेले दिसतात, त्याचप्रमाणे कवितेच्या प्रांतात काही अभिनव वाट शोधण्याच्या प्रयत्नातही दिसतात. वरील तीन प्रकारांखेरीज अन्य प्रकारची कविताही संग्रहात समाविष्ट झालेली आढळते. उदाहरणार्थ सामाजिक जाणिवेच्या कविता (ख्रिसमस, मार्क्स तुमच्याशी नाते, जुन्या पिढीस उद्देशून, ही घरे इ.), भावकविता (पाऊलवाट, रात्र गेली...इ.), आत्मचिंतनपर कविता (नग्नवृक्षाचिया, मला नागडे व्हायचे आहे, अभंग इ.), तसेच विविध अनुभव व्यक्त करणाऱ्या अल्पकविता, असा हा कवितांचा बराच मोठा पसारा आहे. पसारा असा शब्द मी मुद्दामच वापरतो. कारण पाऊस पडल्यावर पृथ्वीने हिरवा प्रतिसाद द्यावा इतकी गोखल्यांच्या कवितांची मांडणी नैसर्गिक व म्हणून अव्यवस्थित वाटते. कालक्रम, विषयक्रम अथवा विकासक्रम यांपैकी कोणता क्रम लक्षात घेऊन त्यांनी कवितांची मांडणी केली आहे ते कळत नाही; परंतु कवितेच्या वाचकाला मात्र वर उल्लेखिलेल्या विविधतेची व्यवस्था लावताना कवितांची फेरमांडणी करावी असे नक्कीच वाटेल. अशी फेरमांडणी केल्याने गोखल्यांच्या कवितांचे सौंदर्य व सामर्थ्य वाढेल अथवा कमी होईल असे मात्र नाही; परंतु त्यांच्या आहे अशा मांडणीतून वाचकाला ‘ओळी’तून विखुरलेली कविता गोळा करीत बसावे लागणार आहे. या छोटेखानी लेखाला वर जे शीर्षक दिलेले आहे ते याच अभिप्रायाने. एवढे विषयान्तर सोडले तर गोखल्यांची कविता विविधतेने आणि वैचित्र्याने नटलेली आहे, हे मान्य होण्यास हरकत नसावी.

प्रश्न असा उपस्थित होतो की, विविधतेने नटलेली आणि पुरेशी व्यापक असलेली कविता कितपत प्रभावी ठरते? वाचकाच्या मनावर संकलितपणे कोणता ठसा उमटविते? या प्रश्नासंबंधी साधक-बाधक आणि मनमोकळे विवेचन होणे आवश्यक आहे, असे वाटते. माझ्या मते गोखल्यांच्या कवितेची दोन-तीन असाधारण वैशिष्टचे अगदी ठळकपणे दिसून येतात.

१. कविता कोणत्याही विषयावरील असो अगर कितीही बौद्धिक चमत्काराने नटलेली असो, चिंतनगर्भता हेच तिचे तलस्पर्शी वैशिष्टच आहे, असे जाणवल्यावाचून रहात नाही. जीवन-मृत्यूवरचे एखादे भाष्य असो, प्रियजनास लिहिलेले पत्र असो, अल्पकवितेतील एखादा स्फुट व मुक्त विचारवेध असो अगर कवितेविषयी एखादे स्व-गत असो, गोखल्यांच्या कवितेतील ‘चिंतक’ हेच मध्यवर्ती प्रतिमान म्हणून वाचकाच्या मनापुढे उभे राहते. मुखपृष्ठावर अवतरलेले चिंतकाचे चित्रही याच म्हणण्याचा पाठपुरावा करते.

काव्यविषयाकडे चिंतनगर्भ दृष्टीतून पहाणे हा मला तरी त्यांच्या कवितांचा ल. सा. वि. वाटतो. या चिंतनशीलतेस कोठे उत्कटतेची जोड मिळाली आहे तर कोठे संथ साक्षित्वाची साथ मिळाली आहे. 'आपल्यातच आपल्याला अनुभवत बसणारे घर' अशी कल्पना गोखल्यांनी एके ठिकाणी मांडली आहे. मला वाटते हा त्या घराचाच नव्हे, तर त्यांच्या एकूण कवितेचाच स्वभाव आहे.

२. मुक्त विचारविलास आणि रोकडी अध्यात्मपरता हा गोखल्यांच्या कवितेचा आणखी एक विशेष गुण दिसतो.

पंखापलीकडील वास्तवाचे
जग स्वच्छ दिसावे
मनाने मात्र बेगुमान,
अस्मानी विहरत असावे.

या शब्दात प्रकट झालेले रोकडेपण अनुभवाला सामोरे जाताना जागोजाग प्रत्ययाला येते. आभाळी भिडणारी पाऊलवाट फक्त चार-पाच चांदण्याच परत घेऊन येते, साक्षात् देव होऊनही शुद्ध प्रेमाचे भुकेले म्हणून 'अकेले' फिरावे लागते अथवा जुनी पिढीच आपल्या हितकल्पनांना विरोध करण्यासाठी आपल्या पोटी जन्म घेऊन येते इ. कल्पनांमधून कविमनाचा रोकडेपणा स्पष्ट होतो. 'मन-मसण', 'इतरांपेक्षा वेगळे', 'मी त्या दुकानात' अशा कवितांतून तर हे अधिक प्रखरपणे जाणवते. धूसर व स्वप्निल गूढात हरवून जाणाऱ्या जातीचे हे कविमन नाही अशी साक्ष वरील 'ओळींमधून' खचितच मिळते. आवरणापेक्षा प्रकटीकरणाची धडपड हेच गोखल्यांच्या कवितेचे मला मूलभूत सूत्र वाटते व म्हणूनच त्यांच्या रोकडेपणाचे महत्त्व वाटते.

३. गोखल्यांच्या कवितेचा आणखी एक विलोभनीय विशेष म्हणजे सत्याशी हस्तांदोलन करण्याची निर्भय आणि दिलदारवृत्ती. या वृत्तीतून किती तरी अजोड अशा चमकदार कल्पना प्रकट झाल्या आहेत. गोखल्यांच्या सर्जनशील चिंतनाचे ते उत्तम नमुनेच होत. अशा काही ओळी देण्याचा मोह आवरत नाही.

'मीपणाच्या मथापोटी, विश्व फूल; बाकी भूल.'

'आम्ही आहोत परिस्थिती–विश्वरूप-दर्शन तुम्ही अर्जुन.'

'यथेच्छसि तथा कुरु.'

'जगात राहणे म्हणजेच कसे जगाला रामराम ठोकणे झाले आहे.'

'इतर जे लिहितील त्यांचाच पूर्णविराम मी होणार आहे. त्यांच्यापुढेच पसरणार आहे.'

'शस्त्रावरच शस्त्रक्रिया करण्याची पाळी यावी तशी आज प्रेमाची गत आहे–' वगैरे.

गोखल्यांच्या कवितेची ही वैशिष्ट्य कमीअधिक प्रमाणात जेथे एकवटली आहेत अशा बऱ्याच कविता दाखवून देता येतील; परंतु जेथे ही वैशिष्ट्ये प्रकर्षाने आढळतात अशा काही कविता माझ्या मते दर्जेदार झाल्या असून भाषा व व्यक्तिगत आवडी-निवडीच्या बाहेर निघून गेल्या आहेत. 'ख्रिसमस', पाऊलवाट, रात्री, मरणावर कितीही कविता, रात्र गेली फुका फुका, मी त्या दुकानात, शून्यारण्यक, शब्दांकडून..., इतरांपेक्षा वेगळे तू सुंदर कल्पना दिलीस, तू पाहू नकोस, उदाहरणार्थ मी चाललोय, 'तुमच्याशी नाते', अशा किती तरी कविता चांगल्या आणि प्रभावी म्हणून सांगता येतील. या कविता मराठी भाषेच्या मर्यादा ओलांडून दुसऱ्या कोणत्याही भाषेत संक्रमित होऊ शकतील आणि दूरदेशीचा वाचकही त्यांचा यथायोग्य आस्वाद घेऊ शकेल असा विश्वास वाटतो.

## सैल शब्दरचना

या मर्यादित जागेत गोखल्यांच्या एखाद्या कवितेचे उदाहरण म्हणूनही रसग्रहण करणे शक्य नाही; पण रसग्रहण करण्याजोग्या किती तरी कविता विखुरलेल्या आहेत. तथापि ही बाजू मांडीत असताना कविता वाचून लागणारा विसंगत सूरही संक्षेपाने, पण निःसंकोचपणे ऐकला पाहिजे व सांगितला पाहिजे.

पहिली गोष्ट अशी की, या संग्रहातील काही कविता निवेदनपर, विचारवाहक व म्हणून गद्यप्राय ठरल्या आहेत. 'प्रत्येक प्रश्नाचा एक संदर्भ,' 'विशिष्ट शब्दार्थ संदर्भात', 'मित्रांनो' अशासारख्या 'कवितां'मध्ये बौद्धिक चमत्कृती असतीलही; पण त्यांना यथार्थपणे कविता म्हणता येईल, असे मला वाटत नाही. फार तर त्यांना 'ओळी' हेच नाव शोभेल.

नजरेतून न सुटणारी, किंबहुना थोडीशी खटकणारी दुसरी गोष्ट म्हणजे गोखल्यांची सैल रचना. बहुतांशी कविता मुक्तछंदात लिहिली गेली असल्याने तिच्या रचनेविषयी तक्रार करण्याचे कारण नाही; परंतु जेथे रचनेचे बंधन अपेक्षित आहे तेथे ते काळजीपूर्वक पत्करलेले दिसत नाही. 'असाच मी उभा', 'एका अभंग' इ. रचनेत जो नीटनेटकेपणा आढळतो तो 'येवो सागर,' 'छोटयाशा घरात,' 'पदूचे अभंग' व 'अल्प कविता'(काही) यात का आढळू नये? सडा-सारवण, प्रौढ जबाबदारी, नखरेल सुंदरी अशी शब्दयोजना टाळता – बदलता आली असती तर बरे होते. खेळ खेळत असताना नियम पाळण्याकडे दुर्लक्ष व्हावे, तसे हे खटकते. कवीला जरी हे गौण वाटत असले तरी वाचकाला कविता वाचूनच काव्यास्वाद घ्यावयाचा असतो, याचे भान असले पाहिजे असे वाटते. असो. सैल रचनेचे दुसरे एक रूप म्हणजे कवितांना दिलेली शीर्षके. कवितासंग्रहास दिलेल्या शीर्षकाचा अपवाद सोडला तर आतील कवितांच्या शीर्षकांबाबत त्यांनी अतिशय हेळसांड केलेली दिसते. काही ठिकाणी अगडबंब लांबीची शीर्षके तर काही ठिकाणी कवितेच्या ओळी म्हणजेच शीर्षके आहेत. सुटसुटीत पण अर्थवाही शीर्षके वापरून गोखल्यांना कविता सुबक रीतीने सादर करता येणे शक्य होते, असा वाचकांचा ग्रह, झाल्यास त्यांना दोष देता येणार नाही.

जाता जाता आणखी एक गोष्ट निदर्शनास आणावीशी वाटते. (कवितांच्या निवडीबाबत अनिश्चित व साशंक असे विचार मनोगतात मांडल्यामुळे गोखल्यांना हे आवाहन). गोखल्यांच्या काही कविता भावकविता म्हणून निवडणे शक्य आहे. 'पाऊलवाट', 'रात्र', 'रात्र गेली–छोटयाशा घरात' 'तू पाहू नकोस', 'असा मी उभा'–या कविता उत्कट भावानुभव निरतिशय सुंदरपणे व्यक्त करतात. या कवितांमधून प्रकट झालेले गोखले इतके वेगळे, इतके अंतःकरणस्पर्शी वाटतात की त्यांच्या या भावकविता इतर कवितांपासून वेगळया काढून त्यांनी ती जोपासावी असे सुचवावेसे वाटते. चिंतनगर्भ कवितांबरोबर दाटीवाटीने उभ्या करण्यापेक्षा या भावकवितांना त्यांनी स्वतंत्र जागा द्यावी असे आग्रहपूर्वक सुचवावेसे वाटते.

या सर्व गोष्टी लक्षात घेतल्यावर शेवटी प्रश्न उपस्थित होतो तो असा की, गोखल्यांची कविता वाचकांपर्यंत सरळ जाऊन भिडते का? नसल्यास कोठे कमी पडते? ती कोठे तरी कमी पडते, हे मी सुरवातीच्या दोन-तीन ओळींतच स्वच्छ म्हटले आहे. केवळ व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या अधिक कविता आहेत म्हणून हे घडते, असे मला वाटत नाही.

यापेक्षा दुसरीकडेच कारण शोधले पाहिजे. कवितांचे नॉर्मल व ॲबनॉर्मल असे दोन स्तर गोखल्यांनी कल्पिले आहेत. (कवीची प्रस्तावना) यापैकी दुसऱ्या स्तरात आपली कविता मोडते असे ते सांगतात, पण त्यांच्या बहुतेक ॲबनॉर्मल कवितांचे स्वरूप असे दिसते की, एक तर त्या सर्वच्या सर्व समजतात अगर बहुधा काहीच समजत नाहीत, स्पष्ट होत नाहीत. त्यांच्या स्वतःच्या प्रतिज्ञेप्रमाणे त्यांनी या कवितासंग्रहात आपले अंतरंग नागडे करण्याचा कटाक्षाने प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या या प्रतिज्ञेबद्दल आपण अविश्वास प्रकट करण्याचे काहीच कारण नाही, परंतु त्यांच्या चिंतनाची वाटचाल एकंदरीत दुर्बोधतेच्या आणि तत्त्वविवेचनाच्या कृत्रिमतेत व घुसरतेत दिसेनाशी होताना दिसते. आकाश फाटते आहे, मृत्यूची मंजूळ घंटा, 'Kill the Time', 'ज्या पुलाखाली', 'एक पत्र' इत्यादि कवितांकडे दृष्टिक्षेप टाकल्यास हे आढळून येते. अशा वेळी गोखल्यांच्या ओळी वाचकांपर्यंत पूल उभारण्याऐवजी भिंती म्हणून उभ्या रहातात असे खेदपूर्वक म्हणावे लागते.

गोखल्यांनी त्यांच्या कविता इतरांशी सुसंवाद साधू शकतील की नाही, याबाबत आपल्या मनोगतात शंका व्यक्त केली आहे. त्यात विनय जसा आहे, त्याप्रमाणे भीतीही व्यक्त झाली आहे असे वाटते. कारण नॉर्मल कवितांकडे आपण झुकू लागलो आहोत व त्या आपणास ठीक वाटत आहेत, असे ते स्पष्टच म्हणतात. माझ्या मते एवढा कबुलीजबाब देण्याची अगर 'ॲबनॉर्मल' कवितांच्या संदर्भात असे एकदम पांढरे निशाण दाखविण्याची आवश्यकता नव्हती. काही मर्यादा लक्षात घेऊनही कवितेच्या भूमीवर भक्कमपणे उभे रहता येण्याइतका आत्मविश्वास बाळगावा अशी सरस कामगिरी त्यांनी या संग्रहाद्वारे नक्कीच केलेली आहे. पायांना फुटलेल्या डोळ्यांतून आरपार बघण्याची धमक गोखल्यांनी जरूर दाखविली आहे. अशा अनेक पारदर्शी व क्रांतदर्शी कवितांची नावेही मी वर सांगितली आहेत. त्यांची 'मरणावर जगण्याची' विलक्षण कल्पना घ्या, अगर 'राम राम ठोकत जगातच' रहाण्यासारखे अभिनव जीवनभाष्य पहा. 'दुःखाचे आकार शोधण्याचा' ध्यास बघा अगर 'शुद्ध प्रेमाचे भुकेले असून' 'अकेले फिरणे' लक्षात घ्या. गोखल्यांच्या प्रतिभेचा आवाका स्तिमित करणारा आहे. तथापि आरपार पहाणे आणि कविता पारदर्शक करून सोडणे यातले अंतर अजून तुटावयाचे आहे. अलीकडच्या काठावरून नदीपलीकडील धूसर सौंदर्य निरखण्याची पाळी या संग्रहात वाचकांवर आलेली आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये. ही अडचण गोखले लवकरच दूर करतील अशी आशा करू या. त्यांचा यापुढील आत्माविष्कार या दिशेने असेल अशी अपेक्षाही करू या व भविष्यकाळाबद्दल तशा शुभेच्छाही आगाऊच देऊन ठेवू या.

गोखल्यांनी आपल्या संग्रहास 'ओळी' असे नाव दिलेले आहे. या ओळींमध्ये त्यांनी जसे शब्द भरले आहेत, त्याचप्रमाणे आस्वादकास रंग भरण्यासाठी भरपूर वाव ठेवला आहे. गोखल्यांची जमेची बाजू अशी की, त्यांच्या ओळींवर काव्याचा अध्यास बहुतेक ठिकाणी यशस्वीपणे करता येतो. ओळी संपतात तेव्हा त्यांच्या शब्दकळेभोवती अर्थच्छटेची प्रभावलये दिसू लागतात व काही ओळी अक्षरओळी म्हणून मनात कोरल्या जातात.

—मुकुंद कृष्ण इनामदार

ओळी

प्रदीप गोखले

अभिनव प्रकाशन, मुंबई १४

किंमत पाच रुपये.

---


## NEW TITLES RECEIVED

1. **Bloodline** : (Bestseller-(3 copies)-A powerful novel about the daughter of a pharmaceutical tycoon) –Sidney Sheldon — Rs. 15·00
2. **Urine Therapy**–(Shivambu)–Dr. C. P. Mithal — ,, 5·95
3. **The Spanish Bridegroom**-(Historical Romance)–Jean Plaidy — ,,
4. **The Mill On The Floss**–( Classic )–George Eliot — ,,
5. **The Mystery Of Dr. Fu-Manchu**–( Mystery )–Sax Rohmer — ,,
6. **Inquest Of Bouvet**–( Mystery )–Simenon — ,,

१. सूर्याची पिल्ले–(नाटक)–वसंत कानेटकर — रु. १७·००
२. दिलखुलास–(विनोदी कथा)–सुभाष भेंडे — ,, १४·००
३. प्रीतिचा शोध–(कथासंग्रह)–डॉ. सुमति क्षेत्रमाडे — ,, १५·००
४. कलाकार–(हेनरिक इब्सेन यांच्या 'दि मास्टर बिल्डर' या नाटकाचे रूपांतर)–विनायक राजगुरु — ,, ८·००
५. सूर्यास्त–(नाटक)–जयवंत दळवी — ,, ८·००

○ आपल्याकडे सुंदर TV, छान छान फर्निचर आहे; पण सुंदर पुस्तके आहेत का?
○ त्यासाठी–' फिनिक्स लायब्ररी 'चे आजच सभासद व्हा!!

दि फिनिक्स लायब्ररी

७२७ सदाशिव, पुणे ३०

# आमचे ग्रंथालय

## AT RANDOM

The Reminiscences of Benet Cerf. ( Random house ).

बेनेट सर्फ हा इंग्रजी पुस्तकप्रकाशनातील नेपोलियन समजला जातो. त्याची रॅन्डम् हाउस ही प्रकाशनसंस्था बऱ्याच इंग्रजी पुस्तकांच्या वाचकांना माहीत आहे. बेनेट सर्फनी रँडम हाउस या प्रकाशनसंस्थेमार्फत कैक मातब्बर इंग्रजी लेखकांची पुस्तके छापली. यात युजीन ओ'नील, जेम्स जॉइस, जट्रुड स्टॅन, जॉर्ज बर्नार्ड शॉ, विल्यम सारोयान, आर्यविन शॉ, विल्यम फॉकनर, जॉन ओ'हारा, सिंक्लेअर लुई व इतर अनेक लेखक होते.

हा 'रँडम् हाउस 'चा मालक मागच्याच वर्षी दिवंगत झाला. १९२५ मध्ये 'मॉडर्न लायब्ररी' नावाची एक प्रख्यात प्रकाशन-संस्था डबघाईस आली होती. सर्फने आपल्या एका धनाढ्य काकाकडून दोन लाख डॉलर्स उसने घेतले व ही प्रकाशनसंस्था विकत घेऊन टाकली. 'मॉडर्न लायब्ररी' या संस्थेनेसुद्धा आधी दर्जेदार पुस्तके छापली होती. त्यामुळे त्या दर्जेदार पुस्तकांच्या नवीन आवृत्त्यांसाठी बरीच मागणी असे. नवीन आवृत्त्यांमधून मिळालेला नफा सर्फने विविध नवीन पुस्तके छापण्यात वापरला. ही पुस्तके तो at random निवडीत असे. त्यामुळेच त्याने त्याच्या प्रकाशनसंस्थेला Random House हे नाव दिले. पुस्तक छापण्याची निवड यदृच्छेने व सहज सुचेल तशी केली गेली व बेनेट सर्फला यदृच्छा लाभ झाला! Random House चा एक भला मोठा शब्दकोशसुद्धा छापला गेला आहे.

टी. व्ही. वर बेनेट सर्फ हा एक 'जोकर' म्हणून ओळखला जात असे. त्याच्या तोंडात नेहमी पाइप व अवखळ हास्य असे. कोणत्याही लेखकाचा दर्जा तो अचूकपणे हेरत असे. जेम्स जॉइसचे 'युलिसिस्' हे रँडम हाउसनीच छापले होते. असे म्हणतात की, या पुस्तकाने अमेरिकेमधील अश्लीलतेची भिंत मोडली. हे पुस्तक १९३४ मध्ये छापले गेले होते व त्यावर कोर्टात अश्लीलतेचा खटला भरला होता. 'युलीसिसवर' अश्लीलतेचा खटला भरला होता; पण वुल्सीने त्यावर जजमेंट दिले होते. या जजमेंटसकटच बेनेट सर्फने रँडम हाउसतर्फे युलीसिस छापले.

बेनेट सर्फला युजीन ओ'नील हा सर्वांत सुंदर नाटककार वाटायचा. म्हणजे दिसायलाही. त्याच्याकडे पाहिले की एक प्रकारचे आत्मिक समाधान लाभत असे असे सर्फ नेहमी म्हणे. एखादा महान नाटककार कसा दिसावा ( पण आपल्याला तो कधीच दिसत नाही ! ) असा तो दिसत असे. १३ ऑगस्ट १९७७ च्या अंकात मी लिहिलेच आहे की, स्त्रियांना ओ'नीलच्या ओल्या-हिरव्या द्राक्षासारखे डोळे पाहिले की कसे तरीच होत असे. जगावर मोरचूद ओकणाऱ्या युजीन ओ'नीलचे स्मित फारच मनोवेधक होते असे बेनेट सर्फ म्हणत. ओ'नीलचा सडसडीत बांधा पण फारच आकर्षक होता. सर्फ पुढे म्हणतात की, ओ'नील अगदी हळू बोलत असे आणि एखाद्या वाक्याच्या मधेच त्याचा दृष्टिकोन express करण्यासाठी चाचपडत असे.

युजीन ओ'नीलला बेनेट सर्फ 'जीन' या लाडक्या नावाने बोलावीत असे. त्याच्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या पहिल्या रात्री तो कधीच हजर रहात नसे. जेव्हा 'स्ट्रेंज इंटरल्युड' या प्रख्यात नाटकाचा पहिला प्रयोग चालला होता त्या वेळी नाटकाच्या क्षेत्रात इतिहास घडत होता; परंतु जीन त्या वेळी शहरात भटकत होता.

संपादक व प्रकाशक हे talent scouts असतात असे म्हणायला हरकत नाही. त्यांना एक प्रकारचा सीक्स्थ सेन्स असतो. कधीकधी हे लोक माणसातील टॅलंट अक्षरशः हिसकावून कागदावर आणतात. ( व स्वतः श्रीमंत होतात ! ) बेनेट सर्फ हा युजीन ओ'नीलबरोबर समुद्रकिनारी भरपूर फिरत असे. यातला बहुतेक वेळ लेखक आणि त्यांचे लिखाण याविषयी चर्चा करण्यात जात असे. बनेट सर्फला असा अनुभव आला की, लेखकाला स्वतःविषयी बोलणे फार आवडते आणि प्रकाशकांनी त्या स्वतःविषयी बोलण्याला प्रोत्साहन द्यावे असेही त्याला वाटत होते,

युजीन ओ'नीलच्या आयुष्याच्या शेवटीशेवटी त्याला फार सहन करावे लागले. त्याला पार्किन्सनचा रोग जडला. त्याचे हात सारखे कापत असत. या कारणासाठी तो कुणाही अभ्यागताला त्याच्या घरी येऊ देत नसे. जेवताना तर तो कुणालाच जवळ ठेवीत नसे. कारण खाण्याच्या वस्तू त्याच्या हाताला येणाऱ्या झटक्यामुळे लांब उडत असत. युजीनची बायको कार्लोटा हिच्या वागणुकीमुळे त्याला आणखीनच त्रास होत असे. शेवटी शेवटी तीही इतकी अडेलतट्टूसारखी वागायला लागली की ओ'नील दिवंगत झाल्यावर कोणत्याही मित्राला (बेनेट सर्फला सुद्धा) तिने दफनविधीसाठी येऊ दिले नाही! कार्लोटा स्वतः, एक डॉक्टर व एक नर्स एवढीच काय ती मंडळी दफनविधीसाठी हजर होती.

ओनील दिवंगत व्हायच्या आधी त्याने 'लाँग डेज् जर्नी इन्टू नाइट' या आत्मचरित्रात्मक नाटकाचे हस्तलिखित बेनेट सर्फकडे पाठविले होते. सोबत एक चिट्ठीही होती की हे आत्मचरित्रात्मक नाटक त्याच्या मृत्यूनंतर २५ वर्षांनी छापावे; परंतु ओ'नीलच्या मृत्यूनंतर कार्लोटा वारस झाली होती. तिने हट्ट धरला की नाटक आताच छापावे. रँडम हाउसच्या बेनेट सर्फने सरळ नकार दिला व ते हस्तलिखित तिच्या हवाली केले. पुढे हेच नाटक येल युनिव्हर्सिटी प्रेसने लगेच छापले. बेनेट सर्फसारखे ethics बद्दल त्यांना काही सोयरसुतक नव्हते ! अर्थात हे नाटक लगेच 'बेस्ट-सेलर' झाले व 'बुक ऑफ द मंथ क्लब 'साठी ते निवडले गेले.

आता महान लेखकांच्या अहंकाराचे काही मासले बघा. अर्थात जॉर्ज बर्नार्ड शॉ तसा त्याच्या modesty बद्दल कधीच प्रसिद्ध नव्हता, पण जेव्हा बेनेट सर्फ त्याच्याकडे लिखाणाच्या मागणीसाठी गेले तेव्हा शॉ काय म्हणाले माहीत आहे? 'तू युजीन ओ'नीलच्या लिखाणाबद्दल त्याला किती पैसे देतोस ते मला माहीत नाही. मला सांगूही नकोस, पण त्या नाटककाराला तू जेवढे पैसे देतोस त्याच्या दुप्पट मला देशील का? तर माझी पुस्तके छापण्याची परवानगी मी तुला देतो.'

लेखक, प्रकाशक व साहित्यप्रेमी मंडळी हे पुस्तक निश्चितच आवडीने वाचतील.

— जे. एन्. पोंडा

— दि फिनिक्स लायब्ररी.

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ लोकशाहीला भवितव्य आहे काय?

कठोर हुकूमशाही म्हणजे काय चीज असते याची छोटीशी झलक अनुभवून हा खंड-प्राय देश बाहेर पडला खरा; परंतु हुकूम-शाहीला रामराम करताना आणि लोक-शाहीची पुनर्स्थापना करताना लोकांच्या मनी जे होते ते काही आकाराला येऊ शकले नाही. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार यांसारख्या राज्यांची सुभेदारी कुणाच्या हाती असावी यावरून वादळे झाली. ती जरा शमतात तोच चरणसिंग आणि त्यांचे सहकारी राजनारायण यांनी उठाव केला. या उठावाचा वणवा भडकण्यापूर्वी महामंत्र्यांनी हालचाल केली. काही कठोर निर्णय घेतले. दोघे मातब्बर नामदार–खासदार झाले. वाग्युद्ध चालूच होते. हे असेच चालू राहिले तर चार प्रमुख पक्षांचे सामर्थ्य घेऊन सत्तास्थानी आलेला हा जनता पक्ष काही घोटीव आकार येण्यापूर्वीच मोडला जाणार असे वाटण्यासारखी परि-स्थिती निर्माण झाली. स्वत: राजकारणामध्ये राहून घडणाऱ्या घटनांवर भाष्य करण्याची सवय असलेले प्रादेशिक पातळीवरील नेते ही अशी सत्तास्पर्धा अपरिहार्य असते असे सांगू लागले. सत्तास्पर्धेच्या या राजकारणामध्ये जी शासनपद्धती वाचविण्याचा खटाटोप या मंडळींनी केला त्या लोकशाहीलाच नख लागते की काय असे वाटू लागण्याइतकी परिस्थिती खालावली. व्यक्तिगत महत्त्वा-कांक्षेपुढे साऱ्या गोष्टी पातळ झाल्या आणि याच महत्त्वाकांक्षेचा आविष्कार महाराष्ट्रा-तही पहावयास मिळाला.

इंदिराजी सत्तेवरून नेस्तनाबूत होईपर्यंत ज्यांनी त्यांची शागिर्दी केली, त्या पराभूत झाल्यानंतरही ज्यांनी त्यांचा दीर्घकाळपर्यंत पाठपुरावा केला, विधानसभा निवडणुकां-नंतरही ज्यांनी इंदिराजींच्या चेल्यांच्या बरोबरीने सत्ता उपभोगिली त्यांना एक दिवस साक्षात्कार झाला की, चालले आहे हे काही बरे नव्हे आणि मग उतारी झाली. वेगाने घटना घडल्या. दिल्ली साथ देत नाही हे लक्षात आल्यावर बंडाचा झेंडा उभारला गेला. कारण वेळीच बंड करण्याची हिंमत दाखविली नाही तर साऱ्या पुण्याईची राख होऊन कसा पालापाचोळा होतो याचे ठस-ठशीत उदाहरण ज्या दिल्लीकडे पाहून हालचाली करायच्या त्या दिल्लीतच पहा-वयास मिळत होते. बंड करण्यात मोठे धाडस नव्हतेच आणि धोकाही फारसा नव्हता. गरज होती फक्त त्वरेने निर्णय घेण्याची. हे निर्णय घेत असताना ज्यासाठी साहस करायचे ते ईप्सित साध्य होणार हे लक्षात आल्यावर तर थांबून रहाण्यात काहीच मतलब नव्हता. निर्णय घोषित झाला आणि अठ्ठेचाळीस तासांत महाराष्ट्राला नवीन सरकार मिळाले. सत्ता नजरेच्या टप्प्यात नसताना ज्यांनी तीस-तीस वर्षे विरोधी पक्षात बसून काढली अशा नेत्यांना सर्वोच्च स्थानापासून वंचित ठेवण्यात आले. एकाधिकाराविरुद्ध आवाज उठविणाऱ्यांच्या मागे जाऊन उभे राहण्याची पाळी आली. कारण ही लोकशाही आहे. लोकशाहीच्या नावाखाली जी सत्तास्पर्धा आज पहावयास मिळते ती लक्षात घेता लोकशाही आपल्या देशात दीर्घकाळ नांदू शकेल काय? का पक्षीय संघर्ष, पक्षांतर्गत संघर्ष आणि व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा यांच्या नादान संघर्षामध्ये लोकहित बाजूला पडून लोकशाहीची वाट लागेल अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. एका तरुण खासदाराच्या मते परिस्थिती अशीच राहिली तर जनमत झपाट्याने लोकशाही शासन-पद्धतीच्या विरोधात जाईल. त्याच्या मते आज लोकशाही असलीच तर ती एकाच कारणामुळे आहे. या शासनव्यवस्थेला पर्यायी अशी व्यवस्था आज उपलब्ध नाही. इंदिरा गांधी हे काही या प्रश्नाचे उत्तर असू शकत नाही. भले राजकारण त्यांना अनुकूल ठरत गेले तरीही त्यांचे राजकीय आयुष्य आणखी १२–१५ वर्षांपलीकडे नाही आणि म्हणूनच सर्वसाधारण जनता आज अस्वस्थ दिसते आहे. जनता पक्ष फुटला तर यादवी होईल असे जे बोलले जाते ते याचमुळे. लोकमताचे जू खांद्यावर असलेल्या या पक्षाला आणखी पंचवीस वर्षे तरी वाटचाल करावी लागेल. याच विषयावर एके काळी मंत्रिपद भोग-लेल्या आणि आज विरोधी पक्षात असलेल्या एका खासदाराने सांगून टाकले की, 'स्थिर सरकार' या शब्दाला काही अर्थ नाही हे लोकांना समजून चुकले आहे. केवळ बहु-मताच्या जोरावर सरकार चालू शकत नाही. तर काम करणाऱ्यांमध्ये एकोपा असावा लागतो. सुस्थिर असलेल्या अनेक राज्यसर-कारांची सत्ता धोक्यात आलेली दिसते. याउलट केरळसारख्या राज्यात पूर्वी अच्युत मेनन यांचे आणि आता श्री. अँथनी यांचे सरकार यशस्वीपणे काम करताना दिसते. भोवती घडणाऱ्या घटना जागरूकतेने टिपणारे आणि आपल्या काही पुस्तकांमुळे प्रसिद्धीस आलेले एक पत्रकार श्री. जनार्दन ठाकूर यांच्या मते राजकीय फेरजुळणीच्या पर्वाला प्रारंभ झाला आहे. एवढ्या मोठ्या देशामध्ये सत्ताधारी पक्षाला थोडीफार सूज येणारच! अंतर्गत संघर्षाचे म्हणाल तर काँग्रेसमध्ये अंतर्गत संघर्ष काही कमी झाले नाहीत. स्वातंत्र्योत्तर काळामधील पहिल्या जोरदार संघर्षामध्ये काँग्रेसची शकले उडाली. अनेक मातब्बर नेते काँग्रेसबाहेर पडले किंवा फेकले गेले; पण लोकशाही धोक्यात आली असे तेव्हा लोकांना वाटले नाही. कारण इंदिराजींवर त्या वेळी लोकांचा विश्वास होता. त्यांच्या हाती शासन होते आणि मिळालेल्या आव्हानाला तोंड देण्यास त्या पुरेशा समर्थ आहेत असे लोकांना वाटत होते. आपले सरकार सुस्थिर आहे आणि एक-

जिनसी आहे असे लोकांना वाटावे इतपत वातावरण त्या तयार करू शकल्या. शासन सुरक्षित असले की लोकशाही सुरक्षित अशी अनेक लोकांची भावना होती. सुरक्षिततेचे हे काचेचे तडकलेले भांडे त्या वेळी लोकांना दिसले नाही. आज लोकांना हे सर्व दिसते आहे. भांडणाऱ्या नेत्याची प्रत्येक हालचाल लोकांपर्यंत पोचते आहे. राजकीय आघाडीवरील अशा अशांततेचा– विशेषतः राष्ट्रीय पातळीवरील अशा अशांततेचा–लोकांना सराव नाही. त्यामुळे नेत्यांच्या भांडणामुळे लोक अस्वस्थ होतात. तथापी त्यामुळे लोकशाही धोक्यात येईल असे वाटत नाही.

## ज्वलंत राजकीय जीवन

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये देशात लोकशाही होती हे खरे; तथापि त्या लोकशाहीला तेज नव्हते. जवाहरलालजींनी राज्य करायचे, त्यांच्याबरोबर असणाऱ्यांनी त्यांचा पाठपुरावा करायचा आणि मूठभर विरोधकांनी निस्तेज विरोध करायचा असे वर्षानुवर्षे चालू होते, अशी प्रतिक्रिया जोधपूर विद्यापीठामधील राज्यशास्त्राच्या प्राध्यापकांनी नोंदवली व याच विषयावर बोलताना ते पुढे म्हणाले, तरीही जवाहरलालपर्वातही भारतामध्ये लोकशाही होती असे म्हणायचे मुख्य कारण विरोधक भले मूठभर असतील तरीही त्यांना मुक्तपणे काम करण्याची मुभा होती. आज आपण जे जगतो आहोत, अनुभवतो आहोत ते ज्वलंत राजकीय जीवन. असे राजकीय जीवन जगताना चटके बसतच असतात. तथापि हे चटके सहन करण्याची ताकद सर्वसाधारण जनतेमध्ये नसते. विकसनशील देशांमधील जनता इतर कशापेक्षाही भौतिक सामर्थ्य वाढविण्यावर लक्ष केंद्रित करते. आर्थिक प्रगतीसाठी जी सुस्थिरता लागते ती मिळाली नाही की समाज अस्वस्थ होतो. व्यक्तिगत व कौटुंबिक स्वास्थ्य ही समाजाची सर्वसाधारण धारणा असते. त्यामुळे राजकीय सुस्थिरता ही या समाजाची एक महत्त्वाची गरज असते. आज केंद्रस्थानी एकाच पक्षाचे सरकार असूनही अंतर्गत संघर्षामुळे जी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे तिचा लोकांना राग येतो. तथापी हा राग मर्यादित स्वरूपाचा असतो. कुठल्याही पातळीवर या रागाने प्रक्षोभक स्वरूप धारण केले की, राजकीय जीवनावरही त्याचा परिणाम होतो. नवी दिल्ली येथे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला विद्यमान परिस्थिती लक्षात घेता भारतामध्ये लोकशाही दीर्घ काळ राहील काय ? असा प्रश्न विचारला असता त्याने पटकन् उत्तर दिले, 'निश्चितपणे राहील. आजची परिस्थिती आहे ती निराशाजनक असली आणि नेत्यांनी जनतेचा विश्वासघात केला असला तरी त्यामुळे लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडणार नाही.' कानपूर येथे राज्यशास्त्राचे शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याने सांगितले, गेल्या लोकसभा-निवडणुकीच्या वेळी आम्ही भारावलो गेलो होतो. झपाटल्याप्रमाणे आम्ही काम केले. मोरारजीभाई महामंत्री झाले. चरणसिंग सत्ताधारी झाले. प्रारंभी रुसून बसलेले बाबुजी आतमध्ये आले. आम्हाला वाटले आता सारे काही सुरळीत होईल; पण नाही. लोकशाहीच्या गप्पा मारणारांनी लोकांच्या इच्छा जुमानल्या नाहीत. आम्ही या मंडळींना आदर्श समजत होतो. आज आम्हाला जाणवते की, राजकारणात आदर्शवाद नसतो, सत्तावाद असतो. असे असले तरी आम्ही निराश झालेलो नाही अथवा लोकशाही जीवनपद्धतीवरही आमचा राग नाही. कारण या नेत्यांनी आमची निराशा केली असली तरी पक्ष संकटात असेल तर मंत्रिपद सोडून पक्षकार्य करण्याची इच्छा व्यक्त करणारे अटलजी आहेत, भांडणे विकोपाला जाऊ नयेत म्हणून परदेशदौरा सोडून आलेले मधु लिमये आहेत. एकोप्यासाठी झटणारे जॉर्ज आहेत. त्यामुळे ज्या पक्षाला आम्ही मते दिली त्या जनता पक्षाबद्दल आम्ही अजूनही आशावादी आहोत; पण मला आज काळजी वाटते ती जनता पक्षाच्या भवितव्यापेक्षाही विरोधी पक्षाची. आज राष्ट्रव्यापी पातळीवर उभा राहू शकेल असा एकही विरोधी पक्ष नाही. इंदिरा कॉंग्रेसमध्ये– स्वतः इंदिराजी जोपर्यंत केंद्रस्थानी आहेत तोपर्यंत त्या पक्षाबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. इंदिराजी उणे इंदिरा कॉंग्रेस असा त्या पक्षाचा केवळ चर्चेसाठी विचार केला तर हाती उरतात कमलापती त्रिपाठी, चार-सहा महिन्यांपूर्वीपर्यंत चव्हाणांची साथ करणारे स्टीफन, इंदिराजींची पूजा करण्यात मश्गुल झालेले वसंत साठे. चव्हाण कॉंग्रेसची अवस्था विचार न करण्याइतकी केविलवाणी आहे. आणीबाणीची पापपुण्ये ज्यांच्याबरोबर नाहीत अशी नेत्यांची फळी विरोधी आघाडीवर निर्माण झाल्यावरच सकस विरोधी पक्ष उभा राहील आणि लोकशाही अर्थपूर्ण बनेल. मुंबईच्या एका विद्यार्थ्याच्या मते आजच्या परिस्थितीचा सगळ्यात जास्त फायदा कम्युनिस्टांना मिळेल. डावे-उजवे करीत न बसता कम्युनिस्ट जर एकत्र आले तर पंधरा वर्षांत ते सत्तेवर येतील आणि मग लोकशाहीच्या बुजगावण्याची गरजच राहणार नाही. केंद्रस्थानी जर कम्युनिस्ट आले तर डेमॉक्रॅटिक, सोशॅलिस्ट, रिपब्लिक ऑफ इंडिया अस्तित्वात येईल. ही डेमॉक्रसी अर्थातच एका पक्षाची आणि विशेषतः त्या पक्षात प्रभावी असलेल्या नेत्याची असेल. आज राजकीय पक्ष कितीही असले तरी अखेरचे युद्ध समाजवादी, संघवाले आणि कम्युनिस्ट यांच्यामध्ये होईल त्यात पहिली आहुती समाजवाद्यांची पडेल आणि खरा संघर्ष जनसंघाची विचारसरणी आणि कम्युनिस्ट यांच्यामध्ये होईल.

घडणाऱ्या घटनांवर भाष्य करण्याचा वकूब असलेल्या निरनिराळ्या क्षेत्रांमधील मंडळींनी व्यक्त केलेल्या या विचारात लोकशाही शासनपद्धतीबाबत प्रतिकूल स्वरूपाची प्रतिक्रिया व्यक्त झालेली नाही हीच त्यातल्या त्यात समाधानाची बाब मानायला हवी. ◻

## ◻ तुरुंगामधील संशयित आरोपी....

एखादा गुन्हा झाल्यानंतर त्या गुन्ह्याच्या संदर्भात पोलीस काही गुन्हेगारांना पकडतात. एक गुन्हेगार सापडला की, कित्येक वेळा आणखी काही गुन्ह्यांचा आणि गुन्हेगारांचा तपास लागतो. अटकसत्र वाढत जाते आणि तुरुंगामधील संशयित गुन्हेगारांच्या संख्येत भर पडत जाते. कित्येक वेळा पोलीस गुन्हेगाराला प्रत्यक्ष गुन्हा करताना पकडतात आणि संबंधित गुन्हेगाराला अटक करून पुरावा गोळा करू लागतात. ज्यांचे थोडेफार लागेबांधे असतात अथवा ओळखीपाळखी असतात आणि

ज्यांच्या गुन्ह्यांचे स्वरूप फारसे गंभीर नसते अशा गुन्हेगारांना जामीन मिळतो; परंतु ज्यांना या सवलतीचा फायदा या ना त्या कारणाने मिळू शकत नाही असे सर्व आरोपी तुरुंगामध्ये खितपत पडलेले असतात. देशामधील १२१९ तुरुंगांमधून प्रतिवर्षी पंधरा लक्ष आरोपी दाखल होतात. या आरोपींचे हाल कुत्रा खात नाही. त्यांना किती काळ तुरुंगात राहावे लागेल हे निश्चित नसते. अशीही उदाहरणे आहेत की, आरोपीवरील गुन्हा शाबीत होऊन त्याला न्यायालयाने शिक्षा ठोठाविण्यापूर्वी आरोपीनें त्याला दिलेल्या शिक्षेइतका काळ तुरुंगात काढला आहे. गुन्हा सिद्ध होण्यापूर्वी भोगलेल्या या शिक्षेची दखल प्रत्येक वेळी घेतली जातेच असे नाही. शिवाय असे संशयित गुन्हेगार तुरुंगात असेपर्यंत त्यांना कोणतीही सवलत मिळत नाही, काम मिळत नाही अथवा पैसेही मिळत नाहीत. आपला खटला कधी सुरू होतो याची वाट पाहात त्यांना स्वस्थ बसावे लागते. वाट बघत शिक्षा भोगण्याचा हा काळ भयावह असतो. पोलिसांकडून अतिशय तुसडेपणाची वागणूक मिळते. नातेवाईक-स्नेही-सोबती यांच्यापासून ही मंडळी दूर असतात. भवितव्य अनिश्चिततेच्या अंधाराने झाकळून गेलेले असते. आर्थिक ताकद मुळातच नसते. त्यात तुरुंगात भरती झाल्यावर तर बोलणेच खुंटले. ज्या गुन्ह्याच्या संदर्भात त्यांना पकडण्यात आलेले असते त्या गुन्ह्याचा पुरावा मिळावा म्हणून पोलिसांकडून सर्व प्रकारची छळणूक चालू असते. थोडक्यात सांगायचे तर गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा भोगणाऱ्या गुन्हेगारांपेक्षाही यांची अवस्था जास्त केविलवाणी असते. श्री. बी. के. रुस्तुमजी यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर केलेल्या पाहणीत याबाबतचे काही अनुभव नोंदले असून आरोपींची ही खोगीरभरती कमी करण्यासाठी काही उपाय सुचविले आहेत.

श्री. रुस्तुमजी यांनी प्रारंभी बंगलोर येथील एका तुरुंगाला भेट दिली तेव्हा त्यांना असे आढळून आले की, तुरुंगामधील आरोपींकडे कमालीचे दुर्लक्ष होते. त्या मानाने गुन्हे सिद्ध होऊन कैदी म्हणून शिक्षा भोगणारांना जास्त सुविधा उपलब्ध आहेत. कैद्यांना काम मिळते. केल्या कामाचे वेतन मिळते. अपरिहार्य परिस्थितीमध्ये त्यांची पेरोलवर सुटका होऊ शकते. काही राष्ट्रीय उत्सवाच्या निमित्ताने कैद्यांना शिक्षेत सूट मिळाली तर त्याचा फायदा या गुन्हेगारांना होऊ शकतो; परंतु ज्यांच्यावर खटले चालू व्हायचे आहेत त्या आरोपींना यांपैकी एकही सवलत मिळू शकत नाही. ज्यांच्यासाठी कोणी जामीन राहू शकत नाही अथवा ज्यांचा जामीन स्वीकारला जात नाही अशा या कैद्यांना कोणतेही काम नसल्याने कंटाळवाणे भोग भोगण्याखेरीज त्यांच्यासमोर काहीही पर्याय राहात नाही.

## दारुण उपेक्षा—केविलवाणी प्रतीक्षा

बंगलोर तुरुंगामधील पाहणीमध्ये असे आढळून आले की, एकूण कैद्यांपैकी केवळ ८३५ शिक्षा भोगणारे कैदी असून ६०४ आरोपी आपल्यावरील खटला कधी सुरू होणार याची वाट पाहात बसले आहेत. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही की, तुरुंगामधील व्यक्ती सिद्ध गुन्हेगार असो अथवा संशयित आरोपी असो, त्या व्यक्तीला तुरुंगामध्ये ठेवण्यासाठी सरकारला प्रतिवर्षी ४ ते ४॥ हजार रुपये खर्च करावे लागतात आणि त्या दृष्टीने तुरुंगामधील आरोपींची संख्या कमीत कमी कशी होईल हे पाहणे अगत्याचे वाटते. आज केल्या गुन्ह्याची शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांपेक्षा केवळ संशयित आरोपी म्हणून तुरुंगात खितपत पडणारांची संख्या फार मोठी आहे. कळकट कपडयांतील हे केविलवाणे चेहरे आला दिवस कसा तरी ढकलीत असतात. त्यांना जसे काम नसते त्याप्रमाणे काही व्यायामही नसतो. या अगतिकतेमुळे मग तो वाट पाहणारा कधी कधी संतापतो आणि मारपीट करून पोलीस त्याला नरम करतात. खटला सुरू होईपर्यंतचा हा सारा काळ त्याला एका विचित्र मानसिक प्रवासातून कंठावा लागतो. त्याच्या मनाचा तोल ढळतो; डोक्यात विचारांचे काहूर माजते आणि नको त्या दिशेने डोके काम करू लागते. मामुली गुन्ह्यामुळे तुरुंगात दीर्घकाळ खितपत पडलेले आरोपी कित्येक वेळा अधिक सफाईने गुन्हे कसे करावेत याचाच विचार करताना दिसतात. समाजाबद्दल त्यांना घृणा निर्माण होते आणि पोलिसांबद्दल द्वेष खदखदू लागतो. न्यायालयाने पुढे जरी त्यांची निर्दोष सुटका केली तरी त्यांच्या मनामधील या भावना तशाच खदखदत राहतात. त्यात सुटलेल्या गुन्हेगारांच्या बाबतीतही समाजाची नजर साफ नसल्याने त्यांना समाजात किंमत राहात नाही. सुटलेला आरोपी भले निर्दोष म्हणून सुटो, समाज त्याला सर्वसाधारण नागरिक म्हणून स्वीकारण्यास तयार नसतो. आरोपी निर्दोष आहे हे समाजाला सहजी पटत नसल्याने आरोपी हा काही तरी क्लृप्त्या करून सुटला असाच एकंदर समज होतो. समाजाकडून येणाऱ्या कडवट अनुभवांमुळे आरोपी बिथरतो आणि त्याच्या हातून आणखी गुन्हे घडण्याचा संभव वाढतो. बंगलोरच्या ज्या तुरुंगाची पहाणी करण्यात आली तिथे एक वर्षाहून अधिक काळ बंदिस्त असलेल्यांची संख्या दहाहून अधिक होती. किती आरोपींना गुन्हे सिद्ध होऊन शिक्षा होते आणि किती आरोपी निर्दोष सुटतात हेही पहाण्यासारखे आहे. साधारणपणे ५० टक्क्यांहून अधिक आरोपींची सुटका होते तर एक वर्षाहून ज्यांना जास्त शिक्षा होते अशा गुन्हेगारांचे प्रमाण चार टक्केही नसते. तुरुंगामध्ये आरोपी म्हणून असलेल्यांची पहाणी करताना जाणवलेली आणखी एक गोष्ट म्हणजे एवढ्या मोठ्या संख्येने आरोपी तुरुंगात असूनही पोलिसांना आणि अधिकाऱ्यांना फारसे काही वाटत नाही. एका अधिकाऱ्याला प्रश्न विचारल्यावर त्याने उत्तर दिले, यांची खरी जागा इथे तुरुंगातच आहे. हां, आता तुम्ही म्हणता त्याप्रमाणे काहींनी गुन्हा केला नसेल, तर ते सुटतील; परंतु ते सगळे न्यायालयात ठरणार ! आता यांचे खटले लवकर चालत नाहीत याला आम्ही काय करणार ? तुम्हाला वाटते इतके हे आरोपी साधे नसतात. उगाच वाटेल त्याला उचलून तुरुंगात टाकायला आमचे डोके फिरले आहे काय ? ही मंडळी तुरुंगात असल्याने बाहेरचा समाज सुरक्षित राहतो. कदाचित त्याला असे सुचवायचे असावे की, गुंडमंडळींना आम्ही या ना त्या कारणाने मोठ्या प्रमाणावर अडकवून ठेवीत असल्याने सामाजिक सुरक्षिततेची भावना वाढते. त्याचे हे म्हणणे पटण्यासारखे नाही, कारण मामुली कारणे दाखवून अनेक सामान्य—

गरीब लोकांना कैद करून ठेवण्याची वृत्ती त्याच्या बोलण्यातून डोकावते. त्यातही गुंड मोठ्या प्रमाणावर पकडले जात नाहीत हा भाग आहेच. प्रत्यक्षात मनमानी करणारे गुंड बाहेरच रहातात आणि कित्येक नवशिके मात्र पकडले जातात. न्यायास दिरंगाई करणे म्हणजे न्याय नाकरण्यासारखेच आहे, असे जे एक इंग्रजी वचन आहे, त्याची उत्तम प्रचीती आपल्या तुरुंगातून येते. मामुली कारणे दाखवून ज्यांच्यावर चॅप्टर भरण्यात येणार आहे असे सुमारे ४५ कैदी बंगलोरच्या तुरुंगात खितपत पडले असून चार–चार महिने होऊन गेले तरी प्रत्यक्षात कारवाई केली जात नाही ही चिंताजनक बाब असल्याचे श्री. रुस्तुमजी यांनी नमूद केले आहे. याच तुरुंगामधील आणखी एक उदाहरणही त्यांनी नोंदले आहे. दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना खुनाच्या गुन्ह्याखाली १९७५ मध्ये पकडण्यात आले आणि अठ्याहत्तरच्या जूनपर्यंत खटल्याचे कामकाजही सुरू झाले नव्हते. खुनासारख्या गुन्ह्यात मजबूत पुरावा गोळा करण्यास बराच वेळ लागतो हे मान्य केले तरी खटल्याचे प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वी या तरुणांना तीन वर्षे कारावासामध्ये पडून रहावे लागले ही गोष्टही आपल्या न्यायदानव्यवस्थेवर पुरेसे भाष्य करणारी आहे. याच तुरुंगामध्ये एका उतारवयाच्या कारकुनाला पकडून ठेवलेले दिसले. त्यालाही काही किरकोळ गुन्ह्याच्या संदर्भात संशयावरून पकडले होते. त्याच्याशी चार शब्द बोलल्यावरच तो किती खचला आहे आणि मनाने मोडून पडला आहे हे सहज लक्षात येत होते. तुरुंगाधिकाऱ्याला आरोपी म्हणून पकडलेल्यांच्या वयाबाबत प्रश्न विचारला असता त्याने सांगितले, वीस ते तीस या वयोमर्यादेमधील आरोपींची संख्या फार मोठी आहे. सुमारे शंभरएक कैदी तर असे आढळले की, त्यांना केवळ १० ते १५ रुपयांच्या मालमत्तेची चोरी केल्याच्या आरोपाखाली पकडण्यात आले होते. यांना असे किती दिवस आत ठेवणार? असे विचारल्यावर पोलिसअधिकारी म्हणाला, गुन्ह्याचे स्वरूप मामुली असेल आणि गुन्हेगार जर नवखा असेल, तर आठ–पंधरा दिवसांच्या तुरुंगवासानंतर त्यांना सोडून देण्याचे अधिकार पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना असतात आणि गुन्हेगारांचा वैयक्तिक पातळीवर विचार करून या अधिकारांचा वापरही केला जातो. सराईत गुन्हेगार आणि मामुली गुन्ह्यांबद्दल पकडलेली कोवळी मुले यांना एकाच जागी ठेवले जाते. मुलाचे वय लहान असेल व वृत्ती संवेदनाक्षम असेल तर त्याला सुधारकेंद्रात पाठविण्यात येते; परंतु तो निर्णय न्यायालयात होतो. तोपर्यंत नवशिक्या गुन्हेगारांना वेगळे ठेवण्याची सोय नाही. गुन्ह्यामधील संशयित व्यक्तींना दीर्घकाळ तुरुंगात रहावे लागते या गोष्टीला सध्या तरी इलाज नाही असेच बहुतेकांच्या बोलण्यात आले.

## न्यायालयाकडून निष्ठुर वागणूक

आरोपी म्हणून ज्यांना न्यायालयांपुढे उभे करण्यात येते त्यांच्याबाबत न्यायालयाकडूनही कोरडी वागणूक मिळते. कोणी तरी हजर नसल्यामुळे अथवा वकिलांच्या विनंतीवरून ज्या वेळी तारखा देण्यात येतात त्या वेळी ज्याला आपण पुन्हा दोन महिन्यांनी हजर करा असे सांगितले तो कैदी आहे तरी कसा हेसुद्धा पाहिले जात नाही आणि अतिशय अनिश्चित वातावरणामुळे आरोपी पुन्हा तुरुंगाकडे पाठविला जातो. तुरुंगामधील महिला वॉर्डमध्ये काही तरुण मुली दिसल्या. त्यांच्यावर चोरटा वेश्याव्यवसाय केल्याचा आरोप होता. हे आरोप सिद्ध करणे फार कठीण असते आणि सिद्ध होऊन शिक्षा झाल्याच तर या महिला जास्त बेरड बनतात. यामुळे वेश्याव्यससायाच्या संदर्भात गुन्हेगार जर पहिल्यांदाच पकडला गेला असेल तर खटला वगैरे दाखल करण्यापेक्षा अशा मुलींना सुधारकेंद्रात पाठविणे योग्य नाही का? पण असा विचारच होत असलेला दिसत नाही. पुरुष असो, महिला असो अथवा एखादा कोवळ्या वयातील मुलगा असो, त्यांना सरळ प्रथम तुरुंगामध्येच डांबण्याची प्रवृत्ती जास्त दिसते.

खुनाच्या गुन्ह्याबाबतची जी कमाल शिक्षा–मरेपर्यन्त फाशी–तो गुन्हा निरपवादपणे सिद्ध झाला तरच दिली जाते ही एक त्यातल्या त्यात दिलासा देणारी गोष्ट आहे. १९७४–७५ या वर्षी संपूर्ण देशात एकूण ३५३ गुन्हेगारांना फाशीची सजा देण्यात आली. त्यामध्ये दोन महिला होत्या. एकूण २ हजार खुनांचे गुन्हे दाखल झाले होते, असे उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसते. कर्नाटकमध्ये मात्र फाशी देण्याचे प्रमाण अत्यल्प दिसते. १९७६ व ७८ या वर्षात एकाही गुन्हेगाराला फाशीची सजा देण्यात आलेली नाही.

## आर्थररोड तुरुंग

बंगलोरनंतर श्री. रुस्तुमजी यांनी आर्थररोड तुरुंगाला भेट दिली. मुंबईमधील या तुरुंगात केवळ ३४० शिक्षा भोगणारे कैदी होते, तर आरोपींची संख्या १०३६ इतकी होती. त्यांचे परस्पर प्रमाण १ : ३ असे असल्याचे दिसून आले. केवळ याच तुरुंगाची असे नव्हे तर एकंदरीतच आपल्या तुरुंगांची दुरवस्था ठसठशीतपणे डोळ्यांत भरते. एक तर बहुतेक सर्व तुरुंग जुने झाले आहेत. ज्या वेळी हे तुरुंग बांधण्यात आले त्या वेळी जे कैद्यांचे प्रमाण अपेक्षित होते त्यापेक्षा प्रत्यक्षात येथे किती तरी अधिक कैदी ठेवलेले दिसतात. आवश्यक त्या किमान सुविधा व आरोग्यरक्षणाच्या दृष्टीने अपरिहार्य असणारी स्वच्छता याकडेही पूर्ण दुर्लक्ष झालेले दिसते आणि आरोपी म्हणून पकडलेले अनेक जण या साऱ्या त्रासाचा दीर्घकाळपर्यंत अनुभव घेतात. रुस्तुमजी यांच्याबरोबर असलेल्या डी. रामचंद्रन नावाच्या पोलिसअधिकाऱ्याने सांगितले की, आरोपी म्हणून जे पकडले जातात ते प्रामुख्याने तिसऱ्याचवथ्या पातळीचे गुन्हेगार असतात. गुन्हेगारी जगत ज्यांच्या जिवावर चालते अशी दादामंडळी सर्वसाधारणपणे बाहेरच असतात. गुन्हा तसाच मोठा असेल आणि पुरावा बक्कल असेल तरच यांना पकडता येते. आता तस्करीचे किती तरी गुन्हे राजरोस घडत असतात, पण आम्हाला तुरुंगात भेटला तो गुन्हेगार परकी घड्याळे चोरून विकल्याच्या संदर्भात पकडला गेला होता. त्याला पकडून जवळजवळ दीड वर्ष झाले होते आणि अजून त्याच्या खटल्याचे काम सुरूही झाले नव्हते. कित्येक तरुण पोरे घरफोडीच्या गुन्ह्याबाबत पकडलेली दिसत होती. न्यायालयाकडून ताकीद मिळून सुटण्याची शक्यता किती तरी आरोपींच्या बाबतीत सुस्पष्टपणे दिसत होती; परंतु प्रत्यक्षात अशी ताकीद

मिळून सुटण्यापूर्वी त्यांना वर्षभराचा– फुकटचा तुरुंगवास भोगावा लागतो आणि या गुन्हेगारांचे खरे दादा बाहेर सर्व प्रकारचे गुन्हे करीत समाजाची ससेहोलपट करीत असतात. आम्हाला असे सांगण्यात आले की, सर्वसामान्यतः रोज तीन ते चार आरोपींना पोलिसांतर्फे सोडण्यात येते आणि तरीही शाबित गुन्हेगारांपेक्षा आरोपींनी तुरुंग भरभरून वाहताना दिसतात. मुंबईच्या तुरुंगातून महिला कैद्यांपैकी अनेकांना वेश्याव्यवसायाच्या गुन्ह्यासाठी पकडण्यात आलेले असते. रस्त्यावरील या मुलींबाबत तत्परता दाखविला जात असली तरी पंचतारांकित हॉटेलमधील घुमाकूळ व्यवस्थित चालू असतो आणि पोलिस मोठ्या हॉटेलमधून चालणाऱ्या या गुन्ह्यांबाबत फारसे काही करू शकत नाहीत.

### कायदादुरुस्तीची आवश्यकता

नव्याने आरोपींची भरती रोज होत असली तरी पहिल्याने पकडण्यात आलेले आरोपी दीर्घकाळपर्यंत बंदिवासामध्ये असल्यामुळे नवीन आरोपींना जागा मिळणे मुष्किल होते. एखाद्या आरोपीवरील खटला चालू असताना न्यायमूर्तींचे निधन झाले तर संपूर्ण खटला पुन्हा चालवावा लागतो. न्यायदानाबाबत ही जी दिरंगाई चालते त्या बाबत पोलिसही असमाधानी दिसतात. सध्या सुमारे २० लाख खटले देशाच्या विविध न्यायालयांत पडून आहेत. हा गोंधळ कमी करायचा असेल, तर संपूर्ण व्यवस्थेत बदल करणे आणि असलेल्या कायद्यांची काळजीपूर्वक अंमलबजावणी करणे जरूर आहे. अनेक गरीब तरुणांना आरोपी म्हणून पकडण्यात येते आणि दीर्घकाळपर्यंत त्यांची नुसतीच डांबवणूक करून ठेवण्यात येते. त्यामुळे त्यांच्यावरील आरोपींपेक्षा जास्त गंभीर शिक्षा त्यांपैकी कित्येकांना हकनाक भोगावी लागते. हे सारे टाळण्याच्या दृष्टीने रुस्तुमजी यांनी काही सूचना केल्या आहेत.

१) किरकोळ गुन्ह्याखाली ज्यांना पकडले आहे अशा आरोपींना तीन महिन्यांच्या तुरुंगवासानंतर सोडून देण्यात यावे.

२) आरोपपत्र त्वरित दाखल करून खटल्याचे काम त्वरित चालावे यासाठी आवश्यकता वाटल्यास सेवानिवृत्त न्यायमूर्तींची नेमणूक करावी.

३) आरोपींची जी सरसहा खोगीरभरती करण्यात येते ती थांबवून निश्चित भरीव आरोप असलेल्या व्यक्तींनाच अटक करण्यात यावी.

४) दखलपात्र गुन्ह्यांची संख्या कमी करता आली तर पहावे.

या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन जर वेळीच लक्ष घालण्यात आले नाही तर परिस्थिती स्फोटक होईल आणि त्यातून तुरुंगात बंडखोरीही घडण्याची शक्यता आहे. ही पहाणी करणारे श्री. के. एफ्. रुस्तुमजी हे पोलिसकमिशनचे सदस्य आहेत. □

---

रंगभूमी । मुक्काम : छबिलदास

# 'मुंबईच्या कावळ्यांचे' पुण्यात स्वागत व्हावे

उदय कला केंद्र ही सातत्याने नवनवीन प्रयोग करीत राहणारी नाट्यसंस्था रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्त त्यांनी एका उमेदीच्या तरुण लेखकाचे राजकीय आणि सामाजिक प्रवृत्तीवर सहजपणे टीका करणारे आणि उपहास व उपरोध यांनी खच्चून भरलेले नाटय निवडल्याबद्दल प्रथम त्यांचे अभिनंदन !

या नाटकाचा सर्वेसर्वा आहे तो लेखक शफाअतखान 'आणि वश्या प्रेमात पडतो' 'हमार बंगला सोनार बंगला' 'लव्ह स्टोरी' वगैरे बऱ्याचशा एकांकिकांचा लेखक. वरील प्रत्येक एकांकिकेला कुठच्या ना कुठच्या स्पर्धांत बक्षिसे मिळालेली आहेत. नाटकाच्या त्याच्या ह्या पहिल्याच प्रयत्नात त्याने आपल्या एकांकिकांवर बाजी मारली आहे. फक्त लेखनावर एवढे गतिमान वाटणारे नाटक गेल्या चार-पाच वर्षांत छबिलदासने पाहिले नव्हते. रोजरोज तीच परेड पाहून कौटुंबिक जिव्हाळ्याची आजकाल फार न चालणारी नाटके प्रायोगिक म्हणून पाहावी काय अशा विचारात असताना शफायतखानने हा आमचा (छबिलदासच्या प्रेक्षकांचा) विचार बदलून टाकला आहे.

नाटकाची सुरुवात नाटकावरच्या टीकेनेच होते. तिचा आणि मुख्य नाटकाचा तसा संबंध नाहीच. तरी पण हल्ली जोरात चालणारी नाट्यशिबिरे नाट्यसंस्थांचे दोन मिनिटांच्या कामासाठी वापरले जाणारे गुणवंत (?) कलावंत (शिबिरातच तयार झालेले). त्यांच्या तशा जाहिराती यांचो ही अलगदपणे ताणलेली फिरकी. नंतरच्या विषयाशी काही संबंध नसला तरी सुखविणारी.

मुख्य विषय आहे आंध्र प्रदेशातील अलीकडेच झालेल्या वादळाच्या अनुषंगाने निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या पर्यायाने राजकीय पक्षांच्या सामाजिक कार्यावरील कठोर टीका. सरळ कोणाचेही नाव न घेता प्रत्येक राजकीय पक्षाला चपराक दिली आहे. एका कार्यकर्त्याला तुटलेला 'पोर्टेबल' हात सापडतो. तो आधी सापडला असता तर निवडणुकीत त्याचा सिम्बॉल म्हणून वापर करता आला असता. याचो त्या कार्यर्त्याला खंत वाटते–आता चान्स गेल्यामुळे. एक गाढव मरून पडले आहे. त्याची प्रेतयात्रा प्रथम हिंदु व नंतर मुस्लीम पद्धतीने काढली जाते आणि मग प्रेताला कुठला आला आहे धर्म हे सत्य उमगते. मरून पडलेल्या माणसांपुढे हे कार्यकर्ते आपल्याच पक्षाच्या कार्याचा पाढा वाचीत बसतात. वड्यात कसली आली आहे क्रान्ति ? तो तर चक्क व्यापार. इथे 'चहा कमिशन' आहे. समन्स ड्रायव्हरच्या हातात न देण्याची ऑर्डर आहे. मंत्रालयात कोणी कधी सरळ दाद देतो काय ? तिकडे फक्त टोलावले जाते. फोन्स कधी सरळ लागतात काय तीन-तीन चार-चार क्रॉस लाइन्स झाल्याशिवाय ? या सर्वांचे दर्शन आहे.

पण या मृत्युसंग्रामातही गाववाले लोक मात्र पिंडाला शिवायला कावळा शोधीत असतात. तो मिळवायची ऑर्डर कार्यकर्त्यांना सोडली जाते. हंगामी सोय म्हणून एका पोपटाला काळा रंग फासून पिंडाला शिवविला जातो. ( ही कल्पनाच जबरदस्त वाटते ). तो चार–पाच पिंडांना शिवून झाल्यावर त्याच्या खऱ्या आवाजात केकाटतो. असेल ओरडत एखादा कावळा पोपटासारखा असे समजून सुरुवात निभावून नेली जाते. नंतर गावकरी समजतात. तिथला स्थानिक कार्यकर्ता आणि मुंबईतला एक राजकीय कार्यकर्ता यांना अशी पिंडी मिळते की, गावातला कार्यकर्ता म्हणतो ' वादळात मेलो असतो तर बरं झालं असतं.' वर ही आयडिया असते मात्र दुसऱ्याच कार्यकर्त्याची. सरतेशेवटी चार कावळे मंत्रालयातील अनेक खात्यांपैकी एकातून सँक्शन केले जातात. त्यात स्थानिक कार्यकर्ता सरकारी खर्चाने मुंबईची ट्रिप पदरात पाडून घेतो. कार्यकर्ते पुन्हा गावात पोहोचले, तरी विमानाने पाठविलेले कावळे बहुधा विमान हायजॅक झाल्यामुळे पोहोचत नाहीत. गावकरी त्यांची वाट पाहात राहतात. इथेच नाटक संपते.

छबिलदासमध्ये होणाऱ्या नवनाट्यातील हे नाटक म्हणजे एक पुढचे पाऊल समजायला हरकत नाही. त्यात लेखन आणि अभिनय सोडला तर काहीही नाही. लेव्हलस् नाहीत, प्रकाशयोजना नाही, संगीत नाही की 'नयनरम्य' कॉम्पोझिशन्स नाहीत. तमाशाच्या–लोकनाट्यांच्या अंगाने हे नाटक जाते. तरीही एवढे भेदक, उपहासगर्भ आणि मार्मिक निरीक्षणाचे अंग दाखविणारे 'मुंबईचे कावळे' हे नाव त्याही अर्थाने सार्थ आहे की लेखकाला निरीक्षणात कावळ्याचा डोळा आणि उपहासासाठी कावळ्याची चोच ( लेखणी ) लाभली आहे.

दिग्दर्शक दिवेकर यांनी प्रयोग जरी व्यवस्थित बसविलेला असला तरी त्यात किंचित् विस्कळितपणा आढळला. त्याचे कारण कदाचित अभिनयातील व आवाजातील फरक हे असेल. टेलिफोनचा गोंधळ व गाढवाची प्रेतयात्रा ह्यात दिग्दर्शकाचा स्पार्क दिसला. शशिकांत कारेकरांचा गावकरी पक्का बेरक्या आणि झोकदार वाटला. पण 'काय वाट्टेल ते' मधल्या मंत्र्याची छाप त्यांच्या कामावर पडलेली वाटत होती. लीलाधर मयेकरांचा 'क' कार्यकर्ता पसंतीची पावती घेऊन गेला. कमी पडले विसू कामेरकर. मध्ये मध्ये कारेकरांनी टाकलेल्या पदरच्या शब्दांमुळे बहुधा कामेरकर किंचित दचकत होते. कारेकरांचा भारदस्त आणि आत्मविश्वासपूर्ण आवाज व कामेरकरांचा किंचित दबलेला आवाज यातील फरक फारच जाणवत राहिला.

प्रेक्षकांनी हे नाटक एवढं सीरियस घेण्याचे कारण नाही. थोडीफार आठवण ठेवली म्हणजे झाले; हा उपदेश छबिलदासच्या नवनाटक्यांना व टीकाखोरांना असावा. तो आपल्याला आवडला.

—दिवाकर कांबळी


आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा वेगळा शोध
स्पष्ट, परखड आणि प्रामाणिक

जनांचा प्रवाहो चालिला

लेखक : विनय हर्डीकर

किंमत : वीस रुपये

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा...........

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

एक बरी करमणूक

# झोपा आता गुपचुप!

विनया खडपेकर

'झोपा आता गुपचुप!' या नाटकाचे लेखक श्री. अशोक पाटोळे आहेत आणि दिग्दर्शन श्री. आत्माराम भेंडे यांनी केलेले आहे.

मनोहर नावाच्या तरुणाच्या जगावेगळचा स्वप्नातल्या अनुभवामुळे निर्माण होणारा गुंता हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

हा विषय तीन अंकी फार्समधून मांडला आहे. मनोहर आणि प्रतिमा हे तरुण जोडपे. मनोहर रात्री झोपेत जे बडबडतो त्यावरून प्रतिमाला शंका येते, याची बायकांची लफडी आहेत. मनोहर पुन:पुन्हा सांगतो, मला विचित्र स्वप्ने पडतात. जे चित्र पाहीन ती व्यक्ती प्रत्यक्ष अवतरते. जाग आली की निघून जाते. प्रतिमाला हे पटत नाही. ती रागाने माहेरी जाते. मग मनोहरचा मित्र सतीश येतो. सतीशला तो आपली व्यथा सांगतो. त्याला पटविण्यासाठी शिवाजीची तसबीर पाहून मनोहर झोपतो. मनोहरचे स्वप्न सुरू होते. शिवाजी अवतीर्ण होतो. सतीश चकित होतो. मनोहरवर विश्वास ठेवतो. जेव्हा मनोहर जागा होतो तेव्हा शिवाजी निघून जातो. थोडचा वेळात प्रतिमा परत येते. चिडल्यामुळे प्रतिमा आत झोपते. मनोहर बाहेर झोपतो. तो प्रतिमाचाच चार वर्षांपूर्वीचा फोटो पाहून झोपतो. त्यामुळे चार वर्षांपूर्वीची प्रतिमा येते. प्रेमालाप होऊ लागतात. जाग येते तेव्हा भ्रामक प्रतिमा अदृश्य होते. खरी प्रतिमा आतून दार ठोठावीत असते. दार उघडल्यावर ती संशयाने पाहू लागते. मनोहरचा अजब स्वप्नानुभव तिला पटतो. नंतर ती एका मानसोपचारतज्ज्ञाला आणते. हिप्नॉटिझम वगैरे माहीत असलेला तो एक लफंगा असतो. मनोहरला क्रिमिजायटिस, फोटोफोबिया वगैरे झाल्याचे सांगून तो घाबरवून सोडतो. उपचारांसाठी त्या कुटुंबात स्वत:चा प्रवेश करून घेतो. प्रतिमाची, सुंदर फर्निचर, टी. व्ही., फ्रीज अशी आवड हेरतो आणि स्वत:चे जाळे पसरतो. मनोहरला नोटा दाखवून उपचारांसाठी म्हणून हिप्नॉटिझमने झोपवायचे. त्याच्या स्वप्नामुळे गादीखाली येणाऱ्या नोटा घ्यायच्या आणि प्रतिमाला घेऊन बाहेर पडायचे. तिच्या हौशीप्रमाणे सारे खरेदी करायचे असे सुरू होते. डॉक्टर प्रतिमाबरोबर पळून जाण्याचा बेत आखतो. ब्लॉकचे स्वरूप पालटते. सारे नवीन येते. मनोहरला कळत नाही, हे सगळे कसे येते! ते त्याला सतीशकडून कळते. मात्र वहिनींनी डॉक्टरला अंगाला हात लावू न दिल्याची खात्री देतो. सतीश, मनोहर, प्रतिमा पोलिसांच्या साहाय्याने युक्ती योजतात. तरी डॉक्टर एक-दोन हुलकावण्या देतो. शेवटी पोलिसांच्या ताब्यात सापडतो. असे नाटकाचे थोडक्यात कथानक.

ही एक फॅन्टसी आहे. येथे असे घडू शकते का, हा प्रश्न गांभीर्याने विचारायचा नाही. लेखकाच्या स्वैर कल्पनाविलासातून जे निर्माण होते ते पाहायचे. ही फॅन्टसी फार्सच्या माध्यमातून सादर केली आहे. फार्समध्ये अनेक प्रकार आहेत. घोटाळचांची मालिका गुंफलेले 'रात्र थोडी सोंगे फार', 'घेतलं शिंगावर' यांसारखे फार्स. गंभीर विषय हसत-खेळत खुलविणारे 'सूर्याची पिल्ले', 'आम्ही लटिके ना बोलू' यांसारखे फार्स. 'झोपा आता गुपचुप' या फार्सची जात त्यातील फॅन्टसीमुळे वेगळी झाली आहे. मनोहरचे अजब स्वप्नानुभव, प्रतिमाची मनोहरबद्दलची काळजी आणि श्रीमंतीची हाव, याचा लफंग्या डॉक्टरने उठविलेला फायदा या घटकांच्या रसायनातून 'झोपा आता गुपचुप' निर्माण झाले आहे. या घटकांमध्ये कलात्मक एकरूपता आहे. यामुळे वास्तव आणि अवास्तव यांचा सुंदर मेळ साधला गेला आहे. एका बाजूला श्रीमंतीची हाव असलेली स्त्री, लफंग्या डॉक्टर ही वास्तवात भेटणारी माणसे, तर दुसऱ्या बाजूला मनोहरचे अवास्तव अजब स्वप्नानुभव एकमेकांशी विसंगत वाटत नाहीत आणि एक मनोरंजक फार्स तयार होतो. प्रेक्षकांना आपल्याबरोबर गुंतवून ठेवतो. सतत उत्सुकता ताणून धरतो. कुतूहल जागृत करतो.

कथानकात काही दोष आहेत. मनोहरला असे स्वप्नानुभव का येतात याचे काही तरी स्पष्टीकरण, फार्सच्या प्रकृतीला साजेसे हलकेफुलके (गंभीर नव्हे) कारण नाटकात आले असते तर नाटचसंहितेच्या बांधणीत कोठे फट राहिली नसती. कथानकाचा आणखी एक दोष म्हणजे विनोदनिर्मितीसाठी केलेले ठरीव ठशांचे संवाद. सतीश आणि मनोहर यांचे संवाद अगदी निरर्थक आणि बाष्कळ वाटतात. मनोहर म्हणतो–रविवार किंवा सोमवार असेल. त्यावर सतीश बोलतो–बघ मंगळवार असेल! पुन्हा मनोहर म्हणतो–नाही! गुरुवार होता. हे पुन:पुन्हा बोलले जाते. ही लांबण कशासाठी? मनोहर-प्रतिमा भांडण, मग प्रतिमा-मनोहर एक विरुद्ध सतीश हे संवाद मुख्य विषयाला तितकेसे धरून नाहीत. मराठी नाटकात विनोदाचे काही संकेत निर्माण झाले आहेत. एकच वाक्य पुन:पुन्हा एकाच ढबीत म्हणणे हा त्यातील एक संकेत. प्रतिमा मनोहरच्या तक्रारी सतीशला सांगताना प्रत्येक तक्रारीच्या शेवटी 'होय की नाही हो सतीशभावजी?' असे मानेला एक विशिष्ट झटका देऊन सहा-सात वेळा म्हणते. यात विनोदनिर्मिती नसून रटाळपणानिर्मिती आहे. यामुळे फार्सची गती संथावते. पहिला अंक त्यामुळे अकारण अति लांबतो. अगदी कंटाळवाणा होतो. यापुढे नाटक रंगेल अशी शक्यताही वाटत नाही. (दुसरा अंक अचानक पकड घेतो.) विनोदनिर्मितीसाठी वाह्यात संवादांची, सूचक अश्लील अर्थांची फोडणीही दिली आहे. सामान्य कुवतीच्या नाटकात गर्दी खेचण्यासाठी असे काही तरी केले जाते. येथे ती आवश्यकता नाही. हे दोष वजा केले की, हा शुद्ध करमणूक कर-

णारा निर्मळ फार्स ठरतो. एक प्रसंग किंचित् खटकतो. प्रतिमा बेलबॉटमवर साडी नेसते असे दाखविले आहे. सतीश समोर असताना त्याच्यासमोर साडी नेसण्याऐवजी ती आत जाऊन क्षणभरात साडी गुंडाळून येणे वास्तवाला अधिक धरून झाले असते. कोणतेही देहप्रदर्शन नसले तरी प्रसंगाचा हेतू प्रेक्षकांना चाळविणे हा आहे. यामुळे या प्रसंगाला अश्लीलतेचा वास येतो. अश्लीलता हेतूवर अवलंबून असते. 'प्रभात'च्या 'माणूस' चित्रपटात छायाचित्रीकरणाच्या दृश्यात 'हिरॉइन' भडकून साडी सोडून टाकते आणि आतल्या फ्रॉकवर चालत निघून जाते. प्रेक्षक खूप हसत राहतात. तेथे वस्त्र सोडणेही अश्लील वाटत नाही; पण येथे वस्त्र नेसणेही अश्लील वाटते.

नाटकाच्या विषयाची कल्पना अगदी नवीन म्हणता येणार नाही. 'बाई–बाटली आणि कॅलेंडर' या व. पु. काळे यांच्या दूरचित्रवाणीवरील एकांकिकेत ती येऊन गेली आहे. तरीही श्री. पाटोळे यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा आविष्कार निश्चितपणे जाणवतो.

नाटकाचा प्रयोग निर्दोष आहे. अभिनयात कोणी फारसे डावे-उजवे नाही. संशयग्रस्त होऊन नवऱ्यावर चिडलेली, नंतर त्याच्या जगावेगळ्या स्वप्नसृष्टीमुळे घाबरलेली, कॉलेजकुमारी, नवविवाहित अशा एकाच व्यक्तिमत्त्वाच्या विविध छटा साकार करण्यात सीमा सावंत यांना यश आले आहे. आत्माराम भेंडे (डॉक्टर) रमेश पवार (सतीश) लक्ष्मीकांत कर्पे (मनोहर) यांनी आपापल्या भूमिका समरसून केल्या आहेत. विजयदत्त, आत्मा, हर्ष, मोतीराम पाटील यांनी आपापल्या छोट्या भूमिका चोखपणे पार पाडल्या आहेत. रंगमंचावरील खोलीची सजावट योग्य आहे. सुरुवातीला फर्निचर नसलेली खोली दुसऱ्या अंकात सजविताना कोठे भडक श्रीमंती येऊ दिलेली नाही. मध्यमवर्गीय माणसे हातात पैसे आल्यावर जितपत सजावट करतील तितकीच सजावट दाखविली आहे.

लेखनात चांगल्या दर्जाचे, प्रयोगात निर्दोष परंतु सांकेतिक विनोदांनी डागाळलेले असे हे नाटक आहे. श्री. अशोक पाटोळे मराठीत काही उत्तम दर्जाचे फार्स लिहू शकतील अशी आशा 'झोपा आता गुपचुप' पाहून वाटते.

□

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# सत्यं शिवं सुंदरम्

'सुनते थे नाम हम जिसका' असा बरेच दिवस 'येणार येणार' म्हणून गाजत असलेला राज कपूरचा 'सत्यं शिवं सुंदरम्।' अखेरीस आला.

आर्. के. फिल्म्सच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे चित्रपट कसा छान आहे, झीनतच्या नग्नतेतही कसा अभिनय सामावला आहे, याची आणि म्हणजेच पर्यायाने झीनतच्या शरीरप्रदर्शनाची पद्धतशीर जाहिरात करण्यात आलीच होती. शिवाय राजकपूरच्या दिग्दर्शनापासून चित्रपटाच्या छायाचित्रणापर्यंत बारीकसारीक गोष्टींची वेडी स्तुती करणारे वा वाकडी टीका करणारे रकाने भरभरून लेख चित्रपटांची छान हवा तयार करीत होते. साहजिकच भरपूर वेळा, भरपूर ठिकाणी 'हाउस फुल्ल'च्या पाट्या झळकल्या. गर्दी ह्या चित्रपटाच्या चांगलेवाईटपणाचा निष्कर्ष मी मानीत नाही. म्हणूनच चित्रपटाबद्दल झालेली व चाललेली चर्चा, चित्रपटाविरुद्ध निघालेला मोर्चा, त्या मोर्चावर झालेली टीका हे सगळे पाहून मला असे वाटते की, या चित्रपटाकडे नको तितके लक्ष पुरविले जात आहे. राजकपूरच्या नेहमीच्या आणि फसव्या जाहिरातबाजीला, प्रदर्शनाला बळी पडून अथवा अन्य कारणाने या अत्यंत सामान्य व फालतू चित्रपटाबद्दल, त्याच्या चांगले–वाईटपणाबद्दल निष्कारणच चर्चा चालू आहे.

चित्रपटाची कथा, त्यातील कच्चे दुवे व आक्षेप हे लोकांना पाठ झाले आहेत. त्यांचा मी पुन्हा कीस काढीत नाही. अभिनयाच्या बाबतीत बेबी पद्मिनी ही छोट्या रूपाचे काम करणारी मुलगी एवढीच जमेची बाजू. बाकी शशी कपूरसकट सगळा गाळ! झीनतच्या अभिनयाची कितीही चर्चा झाली असली तरी 'सत्यं पाहण्यास जाताना आपण झीनतचे काय पाहण्यासाठी जातो?' या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाने स्वतःच प्रामाणिकपणे मनाशी ताडून पाहावे. हेच उत्तर झीनत व राजकपूरला अपेक्षित असल्याने त्यांनी नफ्याचा व्यापार केला आहे; त्यामुळे झीनतचा कोरा चेहरा, उपरे भावदर्शन आणि अत्यंत सफाईदार कॉन्व्हेंटी उच्चार यांच्यावर मी टीका करू इच्छीत नाही.

"इसके पाँव शुभ नहीं।" म्हटल्याबरोबर झीनतच्या पायांवर कॅमेरा, "मेरे सपनोंका राजकुमार अपने आप चला आयेगा।" या वाक्यापाठोपाठ शशीकपूरचे आगमन, आरश्याच्या प्रतिबिंबांच्या साह्याने शशीकपूरचा 'बदसूरती'बद्दलचा तिटकारा दाखविणे, लग्न झाल्यावर माप लवंडताना आडवे गेलेले काळे मांजर असल्या घवघवीत; ठोक आणि भुसार गोष्टींना राजकपूरचे दिग्दर्शनकौशल्य म्हणणे म्हणजे कुत्र्याच्या केकाटण्याला कोकिळेचा पंचम म्हणण्यासारखे आहे. या असल्या मोठमोठ्या फुटकळ गोष्टी आणि भव्य सेट्स, प्रचंड दृश्ये असल्या मोठमोठ्या गोष्टींच्या जंजाळात अडकल्याने या मोठ्या दिग्दर्शकाळा छोट्याछोट्या गोष्टींत वास्तव नावाच्या चिल्लर प्रकाराचे भानच राहिलेले नाही, काही ठिकाणी मुद्दाम ते ठेवलेले नाही. गावच्या पुरुषांच्या पोषाखाबरोबर स्त्रियांच्या अ–पोषाखाची वा न–पोषाखाची घेतलेली काळजी ही ठेवलेली अवास्तवता; तर 'भोर भयी पनघट पे' या गीताला पहाटेच पडणारी झीनतची दुपारी अकरा वा एक–दीडची सावली अथवा शेवटी हजारो पंप लावल्याप्रमाणे सरसर उतरणारे पुराचे पाणी ही राहिलेली अवास्तवता. झीनतच्या कमी कपड्यांपासून काम करताना, गाणी

म्हणताना, हलताना, बोलताना, चालताना तिने शरीराला दिलेल्या झटक्यांपर्यंत सगळे कसे या महान दिग्दर्शकाच्या महान व्यापारीपणाला शोभेसे अन् साजेसे.

चित्रपटाला संगीत आहे लक्ष्मीकांत–प्यारेलाल यांचे. त्यांच्या अन्य चित्रपटांमधील संगीतापेक्षा हे खूपच कमी वाईट आहे. बहुतेक सगळी गाणी लता मंगेशकराच्या स्वर्गीयसुंदर, गानमधुर आवाजाने तारलेली. ज्या ठिकाणी या आवाजाशिवाय दुसरा ( नितीन मुकेश अथवा भूपेंद्र ) कोणताही आवाज येतो, तेथे चित्रपटाच्या संगीताच्या मर्यादा लक्षात येतात.

चित्रपटातील कोणाचेही दुमत नसलेला एकमेव भाग म्हणजे छायाचित्रण. छायाचित्रणातही बहुतेक सगळा भाग पाण्याने अडविलेला. पाऊस, धबधबा, सडा, धरण, पूर, स्वप्नसरिता अशा कित्येक रूपांमध्ये हे पाणी दिसते आणि हे दर्शन खरोखरीच विलोभनीय आहे, कधी नयनरम्य आहे, कधी रुद्रभीषण आहे. रूपाच्या चेहऱ्यावर तेल उडण्याच्या प्रसंगापासून सूर्योदय-सूर्यास्तांच्या दृश्यांपर्यंत संपूर्ण चित्रपटभर राधू कर्माकरांच्या कॅमेऱ्याची करामत दिसत राहते, जाणवत राहते. म्हणूनच कलाकारांनी (?) सादर केलेले प्रसंग नकोसे, रटाळ होतात.

केवळ 'सत्यं शिवं सुंदरम्' या उच्च उदात्त नावावरून आणि राजकपूरचा चित्रपट म्हणून त्या चित्रपटाकडून चांगलेपणाची खुळचट अपेक्षा मी मुळीच ठेवली नव्हती. आतापर्यन्त मला हा चित्रपट आवडला नाही, हे सुज्ञ वाचकांना जाणवले असेलच. आणखीही एक गोष्ट खरी–चित्रपटातील देहप्रदर्शन, स्वप्नदृश्य, चुंबन इत्यादी स्वस्त, बाजारू करमणुकीच्या प्रकारांबद्दल जितक्या प्रमाणात विजा कडाडल्या, तितका तो मला आक्षेपार्हही वाटला नाही, एक म्हणज सगळ्याच हिंदी सिनेमांत ह्या प्रकाराचे प्रेक्षकाच्या अभिरुचीच्या माथी खापर फोडणारे एक तत्त्वज्ञान बनले आहे. दुसरे म्हणजे राजकपूरसारख्या मुरलेल्या व्यापाऱ्याकडून वेगळी अपेक्षा नव्हतीच.

राग आणि वाईट एवढ्याचेच वाटते, –

उत्तान शारीरिक प्रणय हाही एक प्रेमाविष्कार असू शकतो आणि त्याचे कलेच्या परीसस्पर्शाने सत्य, शिव, सुंदर दर्शन घडविता येते, या गोष्टीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करून निर्माते ( वा दिग्दर्शक ) तीच शिळी शरीरे एकमेकांना वा आमच्या डोळ्यांना घाशीत असतात आणि आम्हीही वेडे त्यांच्या निबरपणाबद्दल चर्चा करण्यात उगाचच तोंडाची वाफ दवडीत असतो. ◻

---

# दामाद

---

एका आडगावी कारखान्यात नोकरीला आलेला एक तरुण अिंजिनिअर. त्याच्या फाइलमधील 'Unmarried' हा शब्द वाचताच कारखान्यातील जनरल मॅनेजर चौधरी आणि दुसरा गृहस्थ रॉड्रिक्सचे डोळे लकाकू लागतात. आधी त्याच्यावर धुसफुसणारे हे दोघे मुलींचे बाप मग त्याला आपल्याच बडीने चतुर्भुज करण्यासाठी केवळ हात धुऊन त्याच्या सेवेला लागतात. ही नकोशी सेवा आणि नकोसा मेवा टाळण्यासाठी तो तरुण–शरद माजगावकर अनेक घोटाळे करतो, निस्तरतो आणि शेवटी एक मनपसंत बायको मिळवून बंगलोरला पळ काढतो.

अशी ही फार्सच्या वळणावर जाणारी 'दामाद'ची कथा. लेखन आणि दिग्दर्शन या दोन्ही कामगिऱ्या रजत रक्षित या नवोदिताने उचलल्या आहेत आणि बऱ्यापैकी नीटस पार पाडल्या आहेत. दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट असताना तर हे विशेषच नजरेत भरते. प्रत्येक लहान–सहान प्रसंग ठळक बारकाव्यांनी रंगविणे, ही बासू चटर्जींची पद्धत अशा कथेसाठी फारच उपयोगी पडते. नेमका याच पद्धतीचा वापर करण्याचा प्रयत्न रजत रक्षितने संपूर्ण चित्रपटभर केला आहे. अगदी शरद माजगावकर सुरुवातीला थकून–भागून–दमून येतो आणि हताशपणे आपल्या वहिनीला सांगतो, "मुझे नौकरी मिल गयी।" हा सुरुवातीचा प्रसंग किंवा त्याही आधीचा म्हणजे टायटल्सच्या वेळी घेतलेला प्रसंग–बसस्टॉपवर शरद बसमध्ये चढतो, खांद्यावर थोपटणाऱ्या हातात पैसे देऊन तिकिट मागतो, तोच त्या स्कूलबसमधील एका चिमुरड्याचा प्रश्न, –'अंकल, आप कौन–सी क्लास में पढते हैं?" – अशा सुरुवातीच्या प्रसंगांपासून चित्रपटाचा हलकेफुलकेपणा कायम ठेवला आहे. पुढच्या एखाद्या प्रसंगात त्याचा अतिरेक झाला आहे. उदाहरणार्थ—सतत बेलवर बोट ठेवून बेल वाजविणाऱ्या भावाला शरद विचारतो, "आपको संडास जाना था?" पण असा अनावश्यक ताणलेला विनोद एखादाच. हल्ली विनोदासाठी म्हणा, अखंड भारताचे ऐक्य दाखविण्यासाठी म्हणा अथवा प्रादेशिक लोकांचे प्रेम मिळविण्यासाठी म्हणा; हिंदी सिनेमांमध्ये अन्य भाषिक रंगविण्याचे प्रमाण अतिशय वाढले आहे. विशेषतः मराठी आणि बंगाली लोकांवर हिंदीवाल्यांचा फारच डोळा असतो. रजत रक्षितनेही 'माजगावकर' हे मराठी आडनाव आणि 'मळवली' हे अस्सल मराठी ( म्हणजे त्याच्यातील 'ळ' सकट ) ठिकाण घेतल्याने मराठीचा पट्टा मुक्तपणे वापरला. श्रीधर माजगावकर ( शरदचा थोरला भाऊ ) शरदला मराठीतून झापतो, अगदी 'शऱ्या' अशी हाक मारतो, 'नानाची टांग' या सर्वसमावेशक, सर्वव्यापक मराठी म्हणीचा शरद व श्रीधर दोघेही सर्रास वापर करतात, शिवाय या जोडीलाच 'खोटे' हे मराठी पात्रही टाकले आहे. मात्र हा खोटे मराठी बोलणाऱ्या शरदला वारंवार अडवून 'हिंदी में बोलो, हिंदी में बोलो। हम लोग यहीं मार खाते हैं।' असा बहुमोल सल्ला मराठीबाज हिंदीतून सुनावतो. अमोल पालेकर, अशोक सराफ आणि डॉ. श्रीराम लागू या तिन्ही मराठी नटांच्या हिंदीवर एकच पांघरूण घालण्याचे रक्षितचे हे कौशल्य मानायलाच हवे. पुन्हा आपल्या या विनोदाच्या तलवारीला गुजराथीची धार लावून रक्षितने केवळ दुधारी पट्टा अस्तित्वात आणला आहे. शरदची भावजय अतिशय रागावली वा अगतिक झाली की, एकदम गुजराथीवरच यायची. याशिवाय एखादी घटना रंगवून शेवटी ती स्वप्न वा भास असल्याचे दाखवून विनोद–निर्मिती याही हमखास हुकापद्धतीचा वापर करून घेतला आहे. उदाहरणार्थ–जनरल मॅनेजर चौधरीच्या लठ्ठ मुलीशी आपले लग्न झाले असून खोलीतून सजलेला एक हत्ती चीत्कारून आपल्याला बोलावीत असल्याचा

शरदला झालेला भास. आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे काही प्रसंगांमध्ये पार्श्वसंगीत म्हणून केलेला ट्यून्सचा वापर. चौधरींच्या लठ्ठ पोरीच्या आगमनाच्या वेळी ' हातारी 'मधील ' बेबी एलेफंट वॉक'ची ट्यून वापरली आहे तर चौधरींकडे ' नको नको ' म्हणतानाही शरदला जेवायला बसवितात; तेव्हा ' दुखी मन मेरे 'ची ट्यून वाजते. शरदच्या नोकराला पाणी मारून उठविण्यासाठी पाण्याच्या बादल्या रांगेत पास करताना ' साथी, हाथ बढाना, साथी रे 'ची ट्यून ऐकू येते. हे डोके–दिग्दर्शक अथवा संगीतकार ज्या कोणाचे असेल, त्याचे-सुपीक आहे. एकूण अशा सगळ्या युक्त्या-प्रयुक्त्या वापरून चित्रपटाचा हसरा चेहरा ( अगदी नायक–नायिकेच्या प्रेमातही ) फारसा बिघडू दिलेला नाही.

शरद माजगावकर उभा केला आहे– अमोल पालेकरने. त्याची नेहमीची बावळट, घाबरट आणि बुजऱ्या तरुणाची खास भूमिका त्याच्या वाट्याला आली असली; तरी नेहमीचा मेक-अप मात्र त्याने बदलला आहे. चित्रपटाच्या पोस्टरवरूनसुद्धा त्याची कल्पना सहज येईल. त्याने ही भूमिका उत्तम केली आहे, हे वेगळे सांगायला नकोच. डॉ. श्रीराम लागूंनीही श्रीधरची छोटीशीच भूमिका पण अतिशय वेगळ्या ढंगात सादर केली आहे. बाकी सर्व कलाकार आपापल्या जागी ठीक आहेत. फक्त अशोक सराफांचा अपवाद. त्यांनी खोटेची भूमिका केली आहे. त्यांचा हा पहिलाच हिंदी चित्रपट; पण कोणताही डोके असलेला हिंदी निर्माता वा दिग्दर्शक हे पहिलेच काम पाहून तरी आपल्याला घेणार नाही, याची त्यांनी व्यवस्थित काळजी घेतली आहे. क्षणार्धात हसरा, रडका व रागीट या स्थित्यंतरांमधून चेहरा हलविणे ही जर अशोक सराफांची विनोदाची कल्पना असेल, तर चेहऱ्यासकट ती कल्पना हास्यास्पद आहे, असे नम्रपणे सांगावेसे वाटते. विनोदी अभिनय म्हणजे बेलगाम अभिनय नव्हे; त्यामुळे अमोल पालेकर, केश्तो मुकर्जी यांच्याबरोबरच्या प्रत्येक प्रसंगात अशोक सराफ अतिशय कमी पडले, इतकेच नव्हे तर खूपदा प्रसंगातील विनोदाला मारक ठरले.

संगीतकार हेमंत भोसलेंची कामगिरीही चांगली झाली आहे. विशेषत: ' नाचो, गाओ, मजे उडाओ ' हे आशा भोसलेंचे गाणे सुरेख उतरले आहे.

एवढे सगळे मुद्दे जमेच्या बाजूला असूनही ' दामाद ' हिंदी चित्रपटांच्या प्रभावळीतून अजिबात वेगळा पडल्याचे दिसत नाही; कारण आज धंदा करण्यासाठी लागणाऱ्या बहुतेक सर्व गोष्टींचा वापर थोडा अधिक हुशारीने ' दामाद 'मध्ये केला आहे. एक तरुण, त्याला भेटणारी तरुणी, फटदिशी जुळणारे यशस्वी प्रेम, त्यात थोडासा रुसवा आणि त्याचा निरास ही प्रत्येक चित्रपटातील स्वप्नरंजन–कल्पना ' दामाद 'मध्ये आहेच. शिवाय तीन चवचाल पोरी नायकाच्या गळ्यात पडायला येतात, हे निमित्त करून एका नाचाने कॅबरेची कमतरता भरून काढली आहे. एक गाणे व एक पाऊस यांच्या साहाय्याने नायिकेला भिजलेली दाखवून टाकली आहे. नायक व नायिकेला करण्यासाठी थोडे प्रेम, म्हणण्यासाठी एक द्वंद्वगीत, बागडण्यासाठी एक बाग आणि बसण्यासाठी एक सायकल बहाल करून टाकली आहे; पण एवढे सगळे दाखवूनही इतर बरेच काही न दाखविल्यामुळे हा चित्रपट सुसह्यच नव्हे तर बरा वाटला. आज सतत होणाऱ्या भयंकर हिंदी चित्रपटांच्या माऱ्याने ' पहेली ' अथवा ' घर 'सारखी थोडीशी चाकोरीबाहेर गेल्याचा आभास उत्पन्न करणारी वा ' दामाद 'सारखी नेहमीच्या साच्यातील कमीत कमी स्वीकारणारी सामान्य चित्रेही चांगली वाटायला लागतात. या वस्तुस्थितीतच हिंदी चित्रपटसृष्टीच्या भवितव्याचे विदारक प्रतिबिंब आहे. ❑




लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य २० रुपये